किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● शोधन

५● नवशोधनाचे मानकरी

■ सर्वसमावेशक बँकिंग

९■ तपशील सर्वेक्षणाचे....

१३■ ....स्वरूप संधी व अडथळ्यांचे

२३● रस्ते वाहतूक आणि सुरक्षा विधेयक - २०१४ चिकित्सा अंतरंगाची - भाग २

३३● उदारीकरण, उद्योगांचे स्थानांकन आणि वास्तव


**खंड १३ : अंक ११** **फेब्रुवारी २०१५**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**

वार्षिक वर्गणी १००/- रुपये (**परदेशस्थ वाचकांसाठी $ २०**) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

**'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२, २५६५७२१०, २५६५७६९७

ई-मेलः- ispe@vsnl.net

website- www.ispepune.org.in

**अर्थबोधपत्रिका**

**खंड १३ (अंक ११) फेब्रुवारी २०१५**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

*अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

### अर्थबोधपत्रिकेचा हेतू

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# शोधन

नवशोधन (म्हणजे 'इनोव्हेशन') हा आजच्या विज्ञान-तंत्रज्ञानाच्या काळातील जणू मूलमंत्रच आहे. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधनांनी जणू जगाचा चेहरामोहरा आमूलाग्र बदलला. संगणक व माहिती-क्षेत्रांतील तंत्रज्ञानाने जगातील अनेक व्यवहार एका क्लिकवर आणून ठेवले. या संदर्भात थोडे मागे वळून बघायचे झाले तर विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून आजचे आधुनिक विज्ञान अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचू लागले होते. साधारणपणे दुस-या महायुद्धानंतरच्या काळात विज्ञानाचा अधिक प्रसार, प्रचार होऊ लागला. १९६०-७० च्या दशकात 'विज्ञान शाप की वरदान' हा शालेय जीवनात एक निबंधांचा विषय असायचा. त्या निबंधाचा शेवट 'विज्ञान हे मानवाच्या भल्यासाठी आहे, त्याचा चांगला उपयोग करणे मानवाच्या हातात आहे..' अशा प्रकारच्या वाक्यांनी व्हायचा हे अनेकांना आठवत असेल. त्या काळापासून पुढे आल्यानंतरचा आजचा काळ अनुभवणा-या आपणा सर्वांना विज्ञानाने अचंबित केले आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान हातात हात घालून आपल्यापुढे सतत उभे ठाकते आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेत अवकाश ते पाताळ धुंडाळणा-या मानवाने आपल्या दैनंदिन आयुष्यातही अनेक चांगले बदल घडवून आणले आहेत. गरज ही शोधाची जननी असते, असेही म्हटले जाते. गरज आणि त्याचबरोबर विज्ञानातील नवे काही समजून घेण्याची जिज्ञासा आणि नवनवीन तंत्रज्ञानाची निर्मिती करण्याचा ध्यास माणसाला स्वस्थ बसू देत नाही. 'आता पुरे' असे शब्द मानवाच्या ओठी येत नाहीत उलट, आणखी नवीन काय करता येईल असा विचार संशोधक सतत करत असतात. अशी जिज्ञासा व ध्यास ही नवशोधनाची प्रेरणा ठरते. विविध क्षेत्रांत असे नवशोधन आकाराला येत असते. नवशोधनांमुळे आणखी नवनवीन सुविधा उपलब्ध होत जातात. विज्ञानातील प्रगतीमुळे सुखकर बनलेले माणसांचे जीवन अधिक सुखकर बनू लागते. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर हळूहळू वाढतो आणि त्या तंत्रज्ञानाचा प्रसार व त्या संदर्भातील खर्चही कमी होतो, मग ते अनेकांच्या वापरात येते.



अनेकानेक प्रकारच्या तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष उपयोग सर्वसामान्य नागरिकांना होत असतो. कंपन्याही आपल्या ग्राहकांना अधिक चांगली सेवा देण्याच्या उद्दिष्टाने अशा संशोधनांवर खर्च करीत असतात. संशोधनांना चालना देणे हा सरकारच्या धोरणांचाही भाग असतोच. कधीकधी अनेक संशोधने प्रयोगशाळेच्या पातळीवरच राहतात ही बाबही इथे लक्षात घ्यावी लागते. तरीदेखील संशोधनाची, नवशोधनाची प्रक्रिया निरंतर चालू राहण्याची गरज असते. 'प्रयत्ने वाळूचे कणही रगडता...' अशी वृत्ती अंगी बाणवावी लागते. त्यातून पुढे जाण्याच्या दिशा सापडतात आणि मानवी जीवन अधिक प्रगत होण्याच्या शक्यता निर्माण होतात. जीवनाची गुणवत्ता उंचावणे हीच कोणत्याही संशोधन , नवशोधनामागील प्रेरणा असते. त्यामुळे, नवशोधन हे जीवनाच्या प्रत्येक अंगात सुरू च असते. मग ते क्षेत्र बँकिंगचे असो वा वाहतुकीचे! ■■

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

● ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.

● लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

**विज्ञान-संशोधन**

# नवशोधनाचे मानकरी

विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे घडून येणा-या अनेकानेक प्रकारच्या संशोधनांनी आपले दैनंदिन जीवन व्यापलेले आहे. नवीन संशोधनांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष लाभ कोट्यवधी नागरिकांना होत असतो. देशोदेशींची सरकारे व काही खाजगी संस्था अशा संशोधनांना निधी उपलब्ध करून देत असतात. जगभरातील विविध देशांमधील संशोधक अशा नानविध संशोधनांमध्ये गर्क असतात. त्यांच्या अथक प्रयत्नांमधून विज्ञान-तंत्रज्ञानातील सोयी-सुविधा निर्माण होतात. जगभरातील नागरिकांना त्या उपयोगी ठरतात. नवीन संशोधनांचे स्वागत करण्याने आणि संशोधकांना मानसन्मान देण्याने संशोधकांच्या कार्यावर कौतुकाची मोहर उमटत असते. 'द इकॉनॉमिस्ट' या आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यताप्राप्त नियतकालिकाने जागतिक पातळीवर 'इकॉनॉमिस्ट इनोव्हेशन अवॉर्डस्' अलीकडेच जाहीर केली आहेत. सामाजिक आणि आर्थिक नवशोधन, जैवविज्ञान, संगणक व दूरसंचार, ऊर्जा आणि पर्यावरण, ग्राहकोपयोगी सेवा, प्रक्रिया व सेवा नवशोधन, विशिष्ट चौकटीत न बसणारे लवचीक असे नवशोधन आणि उद्योगजगतासाठी उपयुक्त या क्षेत्रांसाठी हे पुरस्कार देण्यात येतात. या क्षेत्रांमधील विजेते व त्यांचे नवशोधन असे-

- **नंदन निलेकणी** - **(सामाजिक व आर्थिक)** - भारतीय नागरिकांसाठी 'बायोमेट्रिक ओळखपत्र' (आधारकार्ड) तयार करण्याची योजना आखणारे आणि 'युनिक आयडेन्टिफिकेशन ऑथॉरिटी ऑफ इंडिया'चे माजी अध्यक्ष व माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील प्रसिद्ध अशा इन्फोसिस कंपनीचे माजी प्रमुख कार्यकारी अधिकारी नंदन निलेकणी यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. एक अब्जापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या भारतात 'बायोमेट्रिक ओळखपत्र' तयार करणे हे एक मोठे गुंतागुंतीचे काम होते. आता 'आधारकार्ड' या राष्ट्रीय ओळखपत्राचा उपयोग भारतीय नागरिकांना अनेक कामकाजांच्या संदर्भात महत्त्वाचा दस्तऐवज म्हणून करता येतो.



- **Jay Keasling** - **(जैवविज्ञान)** - कॅलिफोर्नियातील बर्कले विद्यापीठात रासायनिक अभियांत्रिकीचे अध्यापक असणा-या Jay Keasling यांनी मलेरियावर देण्यात येणा-या औषधांमध्ये लागणारा artemisinin हा एक महत्त्वाचा वनस्पतीजन्य घटक कृत्रिमरीत्या तयार केला.
- **Andrew Rubin** - **(संगणक व दूरसंचार)** - गुगल कंपनीचे उपाध्यक्ष असलेले Andrew Rubin यांनी Android ही ऑपरेटिंग सिस्टिम तयार केली. लहानथोरांच्या हातात असलेल्या स्मार्ट फोनमध्ये हीच सिस्टिम असते. जगभरात दरवर्षी विकल्या जाणा-या स्मार्ट फोनमधील ८५ टक्के स्मार्ट फोनमध्ये Android ही सिस्टिम असते.
- **Urs Holzle** - **(ऊर्जा आणि पर्यावरण)** - गुगल कंपनीत उपाध्यक्ष असलेले Urs Holzle यांच्याकडे गुगलमधील तंत्रज्ञानातील पायाभूत संरचना, सुविधा अशी जबाबदारी आहे. इंटरनेटची सेवा देणा-या serversसाठी मोठ्या प्रमाणावर ऊर्जा लागते. Holzle यांच्या कार्यामुळे गुगलच्या विविध सेवा ग्राहकांना उपलब्ध करून देताना इंटरनेट सेवा देणा-या servers साठी गुगलकडून करण्यात येणा-या खर्चात सुमारे ५० टक्के बचत करणे शक्य झाले आहे.
- **Renaud Laplanche** - **(ग्राहकोपयोगी सेवा)** - कर्जपुरवठा करणा-यांच्या संघटनेचे (Lending Club) संस्थापक व प्रमुख अधिकारी असलेले Renaud Laplanche यांनी कर्ज देणारे व कर्ज घेणारे यांच्यासाठी नवीन व्यासपीठ तयार केले. कर्ज देणे व घेणे हे उभयतांना फायदेशीर ठरणे या संदर्भात त्यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. ज्यांच्याकडे काही बचत आहे ते बँकेत पैसे ठेवतात. पण बचतखात्यांमध्ये ठेवलेल्या रकमेवर बँका कमी दराने व्याज देतात. त्यामुळे ग्राहकांना अपेक्षेएवढा परतावा मिळत नाही. तर, काही ग्राहकांना अल्पकाळासाठी कर्ज हवे असताना बँकांतर्फे क्रेडिट कार्डची सुविधा उपलब्ध केली जाते. मात्र, त्यासाठी भरपूर व्याज आकारले जाते. या दोन्हींमधील मध्यममार्ग म्हणून Renaud Laplanche यांनी कर्जदारांच्या क्लबची स्थापना केली. कर्ज देणारे व कर्ज घेणारे अशा दोघांना परस्परांची माहिती या क्लबच्या माध्यमातून मिळते. व्याजाचा दर उभयपक्षी फायदेशीर ठरेल याची काळजी घेतली जाते.

● **Perry Chen, Yancey Strickler, Charles Adler - (सेवाक्षेत्रातील नवशोधन ) -** विविध प्रकल्पांसाठी/कार्यासाठी निधी मिळविण्याच्या उद्दिष्टाने kickstarter असा उपक्रम Perry Chen, Yancey Strickler, Charles Adler या तिघांनी चालू केला. विविध प्रकारच्या कार्यांसाठी अनेक जणांना मदत करण्याची इच्छा असते. तसेच अनेकानेक कामांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरजही असते. नागरिकांनी एका ठिकाणी असा निधी जमवावा व तो संबंधितांना उपलब्ध व्हावा यासाठी हा Crowdfundingचा (म्हणजे सर्वांनी मिळून जमा केलेला निधी) kickstarter असा उपक्रम चालू करण्यात आला. या द्वारे सुमारे ७० लाख नागरिकांनी एकत्र केलेला एक अब्ज डॉलर इतका निधी ७३ हजार प्रकल्पांना/ कार्यांना उपलब्ध करून देण्यात आला. या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून या क्षेत्रातील नवशोधन पुरस्कार देण्यात आला.

● **Jack Dorsey, Biz Stone, Evan Williams - (विशिष्ट चौकटीत न बसणारे नवशोधन) -** नवमाध्यमांमध्ये लोकप्रिय असलेल्या 'ट्विटर'चे जनकत्व Jack Dorsey, Biz Stone, Evan Williams या तिघांकडे जाते. 'ट्विटर' म्हणजे इंटरनेटवर लघुसंदेश (tweets) पाठविण्याची सुविधा. जगभरातील सुमारे २८कोटी ५० लाख नागरिक दर महिन्याला 'ट्विटर'वर लघुसंदेश पाठवतात. दररोज सुमारे ५० कोटी tweets 'ट्विटर'वर पाठवले जातात. अनेक महत्त्वाच्या घटना आता सर्वप्रथम 'ट्विटर'वरील संदेशांमधून जगभरात पोहचतात, असेही म्हटले जाते.

● **Pixer Company - (उद्योगजगतासाठी उपयुक्त असे नवशोधन) -** संगणकावरील ॲनिमेशन क्षेत्राची सुरुवात Pixer कंपनीने केली व आज ती या क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आहे. कंपनी स्वतः काही ॲनिमेशनपटांची निर्मिती करते. शिवाय अन्य काही कंपन्यांना ॲनिमेशनपटांमध्ये विशिष्ट 'इफेक्ट्स्' घेता यावेत यासाठी साधनसामग्री तयार करते. Pixer कंपनीला आजपर्यंत सुमारे ३० अॅकडेमी अवॉर्ड्स् मिळाले आहेत. त्यातील सात पुरस्कार हे सर्वोत्कृष्ट ॲनिमेशनपटांसाठी मिळालेले आहेत. सर्वसामान्यांना उपयुक्त ठरणारे आणि नवशोधनाचे (इनोव्हेशन) महत्त्व अधोरेखित करणारे हे सर्व पुरस्कार विज्ञान-तंत्रज्ञानातील प्रगतीची झेप दर्शवते. ■■



## हवा निधी संशोधनांसाठी

*विज्ञान-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील संशोधन, अभ्यास, नवसंशोधन यांसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची गरज असते. अशा संशोधनाचे महत्त्व उमगलेल्या दानशूर व्यक्ती जगभरात आहेत म्हणून अशा संशोधनाला व प्रगतीला चालना मिळते. भारतातही स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक द्रष्ट्या व दानशूर व्यक्तींच्या भरघोस आर्थिक सहकार्याने अनेक संशोधन संस्था उभ्या राहिल्या. सर जमशेटजी टाटा यांनी बेंगळूरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सच्या स्थापनेसाठी मदत केल्याचे सर्वज्ञात आहे. कोलकाता विद्यापीठातील विविध विषयांच्या विभागांसाठी तत्कालीन कुलगुरू आशुतोष मुखर्जी यांनी मदत केली होती. अन्य काही व्यक्तींनीही विविध ठिकाणी मदत केल्याने अभ्यास-संशोधन पुढे गेले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या काळात सरकारच्या प्रयत्नांमुळे व आर्थिक मदतीमुळे अनेक प्रकारच्या संस्था उभ्या राहिल्या आहेत. आता विज्ञान-संशोधनांसाठी आता पुन्हा एकदा दानशूर व्यक्ती, संस्था वा कंपन्या यांनी पुढे येण्याची गरज आहे.*

*या संदर्भात पुढील आकडेवारी विचार करण्यासारखी आहे. संशोधन व विकास यांसाठी एकूण ठोकळ देशी उत्पादिताच्या ०.९ टक्के इतकी रक्कम भारतात २०११ मध्ये खर्च केली गेली. त्यातील खाजगी क्षेत्राचा वाटा होता ३० टक्के इतका. याचप्रमाणे जपानमध्ये हे प्रमाण होते ३.६७ टक्के आणि त्यातील खाजगी क्षेत्राचा वाटा होता ७६ टक्के इतका. अमेरिकेत हे प्रमाण होते २.७ टक्के आणि खाजगी क्षेत्राचा वाटा होता ६७ टक्के. जर्मनीमध्ये ही आकडेवारी अनुक्रमे २.३ टक्के आणि ६६ टक्के अशी होती. विज्ञान-संशोधनाच्या क्षेत्रात भारताला इतर देशांप्रमाणे पुढे जायचे असेल तर भारतातील खाजगी क्षेत्राचा वाटा वाढायला पाहिजे असे दिसते. औद्योगिक क्षेत्रातील कंपन्या आणि संशोधन संस्था यांनी परस्पर सहकार्याने विज्ञान-संशोधनाला अधिक चालना देणे गरजेचे आहे.* ■■

आर्थिक १

# सर्वसमावेशक बँकिंग
## तपशील सर्वेक्षणाचे...

समाजातील सर्व घटकांना, विशेषतः, आर्थिकदृष्ट्या निम्न गटातील व्यक्तींना आणि वंचित घटकांना बँकिंग व्यवहारांतील सेवांचा (products) 'ॲक्सेस' माफक दरात, पारदर्शक, न्याय्य पद्धतीने व वित्तसंस्थांच्या मार्फत मिळण्याची प्रक्रिया म्हणजे 'सर्वसमावेशक बँकिंग' (वित्तीय समावेशन) होय. प्राथमिक पातळीवरील बँकिंग सेवा सर्वांना उपलब्ध होणे हा सर्वसमावेशक बँकिंगचा पहिला टप्पा ठरतो (जानेवारी २०१५च्या अंकात या विषयाचा ऊहापोह केला आहेच). सर्वसमावेशक बँकिंगची चर्चा जगभरात चालू आहे. काही देशांमध्ये हा विषय चर्चेच्या पातळीवर आहे, काही देशांमध्ये याबाबत कृती करण्याची सुरुवात झालेली आहे तर काही देशांमध्ये त्या दिशेने पावले पडलेली आहेत. Alliance for Finanicial Inclusion व Global Partnership for Financial Inclusion अशा आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर काही देश एकत्र येत असून त्या वेळी सर्वसमावेशक बँकिंगवर मंथन घडून येते आहे.

The Center For Financial Inclusion हा वॉशिंग्टनस्थित 'थिंक टँक' आहे. सर्वसमावेशक बँकिंगसंदर्भातील संधी आणि अडथळे यांबाबत The Center For Financial Inclusion यांच्यातर्फे २०११ मध्ये जागतिक पातळीवर एक सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणातून पुढे आलेल्या बाबी जाणून घेणे उद्बोधक आहे. तत्पूर्वी, हे सर्वेक्षण कसे करण्यात आले तेही समजून घेणे गरजेचे आहे. विविध देशांमध्ये वित्तीय सेवाविषयक कार्य करत असणा-या ३०१ प्रतिसादकांची मते या वेळी जाणून घेण्यात आली होती. वित्तीय सेवा पुरविणारे घटक, गुंतवणूकदार, लघुवित्त संस्था (Microfinance Institutions - MFI) आणि अन्य सबंधित संस्था वा त्यांचे प्रतिनिधी इत्यादींचा प्रतिसादकांमध्ये सहभाग होता. सर्वसमावेशक बँकिंगबाबत चर्चा घडवून आणणे हेच केवळ या सर्वेक्षणाचे उद्दिष्ट होते, असे सर्वेक्षणात म्हटले आहे.



तसेच, नमुना तत्वावरील क्षेत्रीय पाहणीसाठी ज्या काटेकोरपणे सॅम्पल निवडून सर्वेक्षण करण्यात येते तसे काहीही इथे करण्यात आले नसल्याने या सर्वेक्षणातील निष्कर्ष हे दिशादर्शक समजण्यात यावेत, ते ठोस निष्कर्ष मानण्यात येऊ नयेत, असेही सर्वेक्षणात स्पष्ट करण्यात आले आहे. विविध प्रकारच्या वित्तीय सेवा, त्यांचा दर्जा, वित्तीय सेवा सर्वांपर्यंत पोहचणे, विविधतेने युक्त असलेली स्पर्धात्मक बाजारपेठ आणि वित्तीय सेवांची माहिती असलेला ग्राहकवर्ग या पाच घटकांचा समावेश असलेले वित्तीय सर्वसमावेशन व्यवहारात स्थिरावल्यानंतर ते कसे दिसावे, या बाबत प्रतिसादकांचे मानस आजमावणे हा या सर्वेक्षणाचा हेतू होता.

सर्वेक्षणासाठी प्रश्नावली तयार करताना The Center For Financial Inclusion मधील अभ्यासकांनी अन्य तज्ज्ञांच्या मदतीने संधी आणि अडथळे या दोन्हींसाठी प्रत्येकी ३० मुद्यांची निवड केली होती. या दोहोंतील महत्त्वाचे वाटणारे किमान १० मुद्दे प्रतिसादकांना निश्चित करायचे होते पण त्या वेळी त्यांनी मुद्यांचा प्राधान्यक्रम नोंदवणे अपेक्षित नव्हते. त्यानुसार मिळालेले प्रतिसादकांचे प्रतिसाद अभ्यासासाठी ग्राह्य धरण्यात आले. त्या नंतर दुस-या टप्प्यात प्रतिसादकांनी त्यांनी निश्चित केलेल्या १० पैकी सर्वांत महत्त्वाचे वाटणारे तीन मुद्दे निश्चित करायचे होते. ज्या मुद्याला सर्वाधिक प्रतिसादकांनी सर्वांत महत्त्वाचा असल्याचा कौल दिला तो मुद्दा अभ्यासकांसाठी पहिल्या मानांकनाचा मुद्दा ठरला.

एकूण प्रतिसादकांपैकी १९९ प्रतिसादकांनी (म्हणजे ६६ टक्के प्रतिसादकांनी) संधीचा विचार करता वित्तीय शिक्षण (financial education) याला महत्त्व दिले. त्यामुळे संधींसंदर्भात हा प्रथम मानांकनाचा मुद्दा ठरला. तसेच, अडथळ्यांच्याबाबतीत वित्तीय साक्षरता (financial literacy) याला सर्वाधिक महत्त्व (५७ टक्के) देण्यात आले. याप्रमाणे संधी आणि अडथळे या दोन्हींसाठी दहा मुद्यांची अंतिम यादी तयार करण्यात आली. त्या मुद्यांचा ऊहापोह पुढील लेखात मांडला आहे. प्रतिसादकांच्या निवडीत विविधता होती. तसेच, अभ्यासकांनी मांडलेल्या ३० मुद्यांपैकी सर्व मुद्यांचा समावेश पहिल्या दहा महत्त्वाच्या मुद्यांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रतिसादकाने केलेला होता. म्हणजे, अभ्यासकांनी मांडलेल्या सर्व मुद्यांना प्रतिसादकांनी

महत्त्वाचे मानले होते हे त्यांच्या प्रतिसादावरून समजून घेता आले. प्रचलीत नियमनांच्या अंतर्गत राहून वित्तीय सेवा पुरविणारे घटक आणि नियमनांच्या बाहेर राहून वित्तीय सेवा पुरविणारे घटक, गुंतवणुकदार आणि अन्य आधारभूत पूरक संस्था इत्यादींचा या सर्वेक्षणात समावेश होता. सर्वेक्षणात सहभागी झालेल्या या तीन गटांची टक्केवारी अनुक्रमे २६ टक्के, १६ टक्के आणि ४० टक्के अशी होती. (या गटांना संधी व अडथळे यांसंदर्भात वाटणारे महत्त्वाचे दहा मुद्दे पुढील दोन तक्त्यांत देण्यात आले आहेत). ऊर्वरित १८ टक्क्यांमध्ये तज्ज्ञ, देणगीदार, नियामक इत्यादींचा समावेश होता.

| **संधी** (महत्त्वाचे दहा मुद्दे) | (अ) | (ब) | (क) | सर्वसाधारण मानांकन |
|---|---|---|---|---|
| (१) वित्तीय शिक्षण | १ | ८ | १ | १ |
| (२)वित्तीय सेवांचे वैविध्य वाढवणे | २ | २ | ३ | २ |
| (३)कर्जदारांबाबत माहिती देणारे 'ब्युरो' | ३ | १ | ७ | ३ |
| (४)लघुवित्त संस्थांचे सक्षमीकरण | ३ | ४ | ६ | ६ |
| (५) सर्वसमावेशक वित्तीय संस्था | ५ | ९ | ५ | ७ |
| (६)ग्राहक संरक्षण नियमने | ६ | ३ | २ | ५ |
| (७)मोबाइल (फोन) बँकिंग | ७ | ५ | ४ | ३ |
| (८)लघुवित्तसंस्थांचे सुधारित नियमन व देखरेख | ८ | ६ | ८ | ८ |
| (९)व्यापारी प्रतिनिधींमार्फत बँकिंग | ९ | ७ | ९ | ९ |
| (१०)इलेक्ट्रॉनिक पद्धतीने आर्थिक व्यवहार घडवण्यासाठी वित्तीय सुविधांचे सक्षमीकरण | ९ | २ | - | ११ |

टीप - उपरोक्त तक्त्यात (अ) वित्तीय सेवा पुरविणारे घटक (ब) गुंतवणूकदार (क) अन्य आधारभूत पूरक संस्था यांनी ज्या मुद्यांना जे मानांकन दिले आहे ते त्या त्या मुद्यापुढे दर्शविण्यात आले आहे. शिवाय, या सर्व मुद्यांना मिळालेले सर्वसाधारण मानांकन तक्त्यातील शेवटच्या स्तंभात देण्यात आले आहे. अडथळ्यांबाबतचा पुढील पानावरील तक्ताही अशाच पद्धतीने देण्यात आला आहे.



| **अडथळे** (महत्त्वाचे मुद्दे) | (अ) | (ब) | (क) | सर्वसाधारण मानांकन |
|---|---|---|---|---|
| (१) बँकेची शाखा उघडणे/चालवण्याचा खर्च | १ | ८ | १ | १२ |
| (२)राजकीय हस्तक्षेप | २ | २ | ६ | ५ |
| (३)ग्राहकांच्या गरजांबाबतचे मर्यादित आकलन | २ | ९ | ५ | ४ |
| (४)कर्ज 'ब्युरों'ची वानवा | ४ | १ | १० | ६ |
| (५) लघुवित्त संस्थांच्या मर्यादित संस्थात्मक क्षमता | ५ | ४ | ३ | २ |
| (६)विविध सेवाखर्चांची संरचना | ६ | ७ | ८ | ७ |
| (७) वित्तीय साक्षरतेची वानवा | ७ | १० | १ | १ |
| (८)अपु-या पायाभूत सेवासुविधा | ८ | ५ | ७ | ९ |
| (९) लघुवित्तसंस्थांचा फक्त बचतकेंद्री दृष्टिकोण | ८ | ५ | २ | ३ |
| (१०)वित्तीय संस्थांसंदर्भातील नियमनांची अपुरी चौकट | १० | ३ | - | ८ |
| (११) ग्राहक संरक्षणाची अपुरी तरतूद | - | ७ | ४ | १० |
| (१२) निकृष्ट व्यवसायप्रणाली | - | - | ८ | ११ |

जगभरातील अनेकानेक देशांमधील संबंधितांची मते या सर्वेक्षणादरम्यान जाणून घेण्यात आली होती. पश्चिम युरोपीय देश, अमेरिका आणि कॅनडा येथील प्रतिसादकांची टक्केवारी सर्वांत जास्त म्हणजे ४३ टक्के इतकी होती. त्या खालोखाल लॅटिन अमेरिका २३ टक्के, दक्षिण व पूर्व आशिया १४ टक्के, आफ्रिका १२ टक्के अशी टक्केवारी दिसून आली. मध्यपूर्वेकडील देश, मध्य आशिया, पूर्व युरोप येथील काही प्रतिसादकांनीही मते मांडली होती. पश्चिम युरोपीय देश, अमेरिका आणि कॅनडा येथील प्रतिसादकांचा (४३ टक्के) तसेच अन्य आधारभूत पूरक संस्था (४० टक्के) यांचा प्रतिसाद या सर्वेक्षणात अधिक असल्याचे आढळले. ■■

आर्थिक २

# सर्वसमावेशक बँकिंग
## ....स्वरूप संधी व अडथळ्यांचे

सर्वसमावेशक बँकिंगसाठी ग्राहक वित्तीय साक्षर असणे गरजेचे आहे, याबाबत दुमत नसावे. सर्वसमावेशक बँकिंगसंदर्भातील संधी आणि अडथळे यांबाबत करण्यात आलेल्या सर्वेक्षणातही हेच दिसून आले आहे. संधींचा विचार करता वित्तीय शिक्षण (financial education) या मुद्याला सर्वेक्षणात पहिल्या क्रमांकाचे मानांकन देण्यात आले होते. तर, अडथळ्यांचा विचार करता वित्तीय साक्षरता या मुद्याला प्रथम क्रमांकाचे मानांकन मिळाले होते.

**(१) वित्तीय शिक्षण**

वंचित घटकांच्या (व सर्वांच्याच) दैनंदिन व्यवहारांतील अन्य सर्व बाबींवर चांगले परिणाम घडवून आणण्याची क्षमता असलेले वित्तीय शिक्षण मिळणे; तसेच, त्यामुळे जीवनव्यवहारांतील वित्तीय बाबींवर सुयोग्य नियंत्रण ठेवता येणे हा सक्षमीकरणाच्या दिशेने जाणारा एक उत्तम मार्ग ठरतो, असे मत प्रतिसादकांनी नोंदवले आहे. वित्तीय सेवा पुरविणारे घटक जेव्हा विविध प्रकारच्या वित्तीय सेवा ग्राहकांसाठी सादर करतात तेव्हा ग्राहकांसाठी त्या उपयुक्त असूनही अनेकदा त्या सेवांना ग्राहकांचा प्रतिसाद कमी मिळतो असे आढळते. कारण ग्राहकांना त्या सेवेचे महत्त्व नीटपणे उमगलेले नसते. अशा वेळी ग्राहकांना ती सेवा नीट समजावून सांगायची असेल तर ती समजून घेण्याच्या दृष्टीने ग्राहकांना वित्तीय शिक्षण मिळणे महत्त्वाचे व अत्यावश्यक बाब ठरते. सर्वसमावेशक बँकिंगसाठी वित्तीय साक्षरता हा आरंभबिंदू ठरतो असे नाही पण उपलब्ध होणा-या विविध प्रकारच्या वित्तीय सेवा समजून घेताना वित्तीय शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित होते. वित्तीय सेवाविषयक गुंतागुंत समजून घेण्यासाठी वित्तीय शिक्षण ही जणू आवश्यक अट ठरते. दक्षिण अमेरिकेतील सुमारे ८६ टक्के प्रतिसादकांनी वित्तीय शिक्षणाच्या मुद्याला अधिक प्राधान्य दिल्याचे सर्वेक्षणातून आढळले.



वस्तुतः, घरातील वित्तविषयक बाबी स्त्रिया नीटपणे सांभाळतात, पण वित्त वा वित्तीय व्यवस्थापन असे शब्द ऐकून स्त्रिया बिचकतात. मात्र, एकंदरीत वित्तीय शिक्षणाचा ग्राहकांना चांगला उपयोग होतो, असे मत वित्तीय शिक्षण देणा-या गटांनी नोंदवले आहे. बचत, मालमत्ताविषयक बाबी आणि कार्यक्षम वित्त व्यवस्थापन या तीन संदर्भांतील थोड्या सूचना/ मार्गदर्शन मिळाले तर त्यांना उचित व नेमके निर्णय घेण्यास मदत होईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे. राष्ट्रीय पातळीवर वित्तीय शिक्षणाची योजना आखून तिची अंमलबजावणी करण्यात यावी, वित्तीय शिक्षणविषयक प्रचारमोहिमा राबविण्यात याव्यात, असे काही प्रतिसादकांनी सुचवले.

**(२) ग्राहकांच्या गरजा समजून घेणे**

वंचित गटांमध्ये कार्यरत असणारा बचतगट सर्वपरिचित आहे. पण वंचित घटकांना फक्त कर्ज नको असते तर, त्यांच्या वित्तविषयक आणखीही काही गरजा असू शकतात, ही बाब आता समजून घेतली जाते आहे. लघुवित्त संस्थांनी ग्राहकांच्या गरजा/मागण्या समजून घेऊन त्यानुसार विविध प्रकारच्या वित्तीय सेवा पुरवणे आवश्यक आहे. वित्तीय सेवांचे वैविध्य वाढवणे या मुद्याला संधींमध्ये दुस-या क्रमांकाचे मानांकन देण्यात आले आहेच. लघुवित्तसंस्थांच्या आजपर्यंत असलेल्या केवळ बचतकेंद्री दृष्टिकोणापेक्षा ग्राहकांच्या मागण्या समजून घेण्याला प्राधान्य देण्यात यायला हवे असेही म्हटले गेले आहे. ग्राहकांच्या मागण्या लक्षात न घेणा-या संस्था येथून पुढे अयशस्वी ठरण्याची शक्यताही काही प्रतिसादकांनी नोंदवली आहे. अनेकदा वित्तीय साक्षरतेच्या अभावी ग्राहकांकडून वित्तीय सेवांची मागणी होत नाही. ‘सर्वसमावेशक बँकिंग’ हे पुरवठ्याच्या बाजूने म्हणजे ‘ॲक्सेस’ निर्माण करण्याच्या बाजूने कार्य करत असते. वित्तीय साक्षरता नाही म्हणून मागणी नाही आणि मागणी नाही म्हणून वित्तीय सेवांचा पुरवठा असे नाही, असे दुष्टचक्र चालू राहते. त्यामुळे, ग्राहकांच्या गरजा समजून घेऊन त्यानुसार वित्तीय सेवांचे वैविध्य वाढवणे गरजेचे ठरते. आर्थिक देवघेवीचे व्यवहार सुलभपणे करता यावेत, पैशाचे हस्तांतरण कमी वेळेत सुयोग्य पद्धतीने व्हावे, इस्लामिक बँकिंगचा विचार व्हावा असे काही प्रतिसादकांनी सुचवले आहे.

### (३) मोबाइल बँकिंग व व्यापारी प्रतिनिधी मॉडेल

तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे वित्तीय सेवांचा विस्तार वाढवणे शक्य बनले आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी बँकेच्या शाखा नसतील तेथील नागरिकांना सर्वसमावेशक बँकिंग अंतर्गत येणा-या काही वित्तीय सेवा मिळू शकतील, असे म्हटले गेले आहे. एका प्रकारे, 'शाखाविरहित बँकिंग' म्हणजे 'सर्वसमावेशक बँकिंग' असे समीकरण जणू मांडले जाते. 'मोबाइल फोन बँकिंग' ही सर्वसमावेशक बँकिंगसाठी जणू किल्ली आहे, असेही मत काही प्रतिसादकांनी मांडले आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शक्य बनलेला वित्तीय सेवांचा विस्तार ही मोठी संधी आहे ही बाब मान्य करतानाच 'शाखाविरहित बँकिंग' हा सर्वसमावेशक बँकिंगविषयक चर्चेतील एकमेव वा मध्यवर्ती मुद्दा राहणार नाही, असेही मत मांडले गेले. मोबाइल बँकिंगला तिस-या क्रमांकाचे मानांकन देण्यात आले असून व्यापारी प्रतिनिधी 'मॉडेल'ला ९व्या क्रमांकाचे मानांकन मिळाले आहे.

केनियामध्ये मोबाइल फोन बँकिंगचे M-PESA 'मॉडेल' यशस्वी झाल्याने आफ्रिकेतील नागरिकांनी मोबाइल फोन बँकिंगला सर्वाधिक प्राधान्य दिलेले आढळते. तर, ब्राझीलमध्ये नियमनांच्या अंतर्गत असलेले व्यापारी प्रतिनिधी 'मॉडेल' यशस्वी झाल्याने लॅटिन अमेरिकेतील नागरिकांनी व्यापारी प्रतिनिधी 'मॉडेल'च्या बाजूने झुकते माप दिले आहे. बँकिंग सेवेच्या बाहेर असणा-या नागरिकांना किमान काही वित्तीय सेवा देण्यासाठी मोबाइल फोन बँकिंग हा एक उत्तम पर्याय आहे. मोठ्या लघुवित्त संस्थांचे कामकाज लक्षात घेतले तरी त्या तुलनेत मोबाइल फोन बँकिंगद्वारे वित्तीय सेवांचा पर्याय कमी वेळात अधिकाधिक नागरिकांना उपलब्ध करून देता येतो असे काही अभ्यासांवरून दिसून आल्याचे प्रतिसादकांनी नोंदवले आहे. काही गुंतवणुकदारांनीही मोबाइल फोन बँकिंग आणि व्यापारी प्रतिनिधी 'मॉडेल'च्या बाजूने कल नोंदवला आहे. वित्तीय सेवा पुरविताना येणारा खर्च हाही चिंतनाचा मुद्दा ठरतो. व्यापारी प्रतिनिधी 'मॉडेल'चा अवलंब केल्यास बँकेची शाखा स्थापन करताना पायाभूत बाबींवरील खर्च वाचतो, असे काहींनी नोंदवले आहे. तर, मोबाइल फोन बँकिंगमुळे आर्थिक व्यवहारांचा खर्च (transaction expenses) कमी होतो, असे मत काहींनी नोदवले आहे.



### (४) सक्षम संस्थांची उभारणी

अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना वित्तीय सेवा देणा-या संस्थांचे सक्षमीकरण हा नेहमीसाठीच महत्त्वाचा मुद्दा ठरतो. प्रतिसादकांच्या मते प्रशासन, ग्राहकसंख्येत वाढ, वित्तीय सेवांचा विस्तार आणि सेवा पुरवठ्यांशी संलग्न असलेले धोके टाळण्यासाठी जोखमीचे योग्य ते व्यवस्थापन (managing risk) अशांसारख्या बाबींसंदर्भात संस्थांचे सक्षमीकरण होणे गरजेचे ठरते. लघुवित्त संस्थांची सध्याची क्षमता मर्यादित आहे हा इथे अडथळ्याचा मुद्दा ठरतो. पण त्याच वेळी संस्थांचे सक्षमीकरण हा संधींमधील महत्त्वाचा मुद्दा ठरतो. संस्थांची सामाजिक उद्दिष्टांप्रती असलेली बांधिलकी समजून घेताना ग्राहकांसाठी प्रशासनाचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. संस्था आपल्या मूळ उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी प्रामाणिकपणे कार्यरत आहे हे त्यातून ग्राहकांच्या मनावर ठसते. नवीन ग्राहकांपर्यंत पोहचण्यासाठी तसेच विविध प्रकारच्या वित्तीय सेवांचा विस्तार करण्यासाठी संस्थांतर्गत तंत्रज्ञानविषयक कौशल्यांचाही विचार होणे गरजेचे असल्याचे मत काही प्रतिसादकांनी मांडले आहे. संस्थांचे सक्षमीकरण आणि बदल यांमुळे सर्वसमावेशक बँकिंगचे उद्दिष्ट गाठले जाण्यास मदत होईल. वित्तविषयक बाबींचे तपशील सर्व संबंधितांपर्यंत सुविहितपणे पोहणे गरजेचे आहे. तसेच, विविध प्रकारे उपलब्ध होत जाणा-या माहितीचे सुयोग्य व्यवस्थापन करून बाजारपेठविषयक व ग्राहकविषयक संशोधन होणे उपयुक्त ठरावे, असेही नमूद करण्यात आले आहे. लघुवित्त संस्थांची आर्थिक स्थिती बळकट असणे या मुद्यालाही काहींनी महत्त्व दिले आहे.

अलीकडच्या काळात काही ठिकाणी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध होत आहे आणि वित्तीय सेवा देणा-या संस्था व्यावसायिक बनण्याचा प्रयत्न करीत असल्याचे निरीक्षणही काहींनी नोंदवले आहे. तथापि, सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी घाईघाईने व अनुचित मार्गांचा अवलंब करण्यात येऊ नये असे मत काही प्रतिसादकांनी स्पष्टपणे नोंदवले आहे. अभ्यास व प्रशिक्षण नसलेल्या मात्र घाईघाईने बाजारपेठेत उतरलेल्या आणि लघुवित्त तज्ज्ञ म्हणवणा-या गटांचा अभ्यास व बारकाईने विचार व्हायला हवा, असे काही प्रतिसादकांना वाटते.

## (५) कर्ज ‘ब्युरों’बाबत कृती हवी

कर्ज घेणा-या व्यक्तींबाबतची संपूर्ण माहिती, त्यांनी आधी घेतलेल्या कर्जांबाबतची व त्याची परतफेड त्यानी कशी केली त्याबाबतचा तपशील इत्यादी प्रकारची माहिती ‘ब्युरों’मार्फत मिळण्याची सोय हवी. अशी माहिती मिळवण्याबाबत पूर्वी लघुवित्त संस्था फारशा उत्सुक नसायच्या. पण आता ही गरज अनेकांच्या लक्षात आली आहे. आपल्या ग्राहकांची माहिती आपल्या अन्य स्पर्धकांसमोर खुली व्हावी असे वित्तीय सेवा पुरविणा-या घटकांना वाटत नव्हते हे एक मोठे कारण एकूण नियोजनात ‘क्रेडिट ब्युरो’चा समावेश न करण्यामागे दिले जात होते. ‘क्रेडिट ब्युरो’ची स्थापना कोणी कराची याबाबतचा संभ्रमही होता/आहे. आता कार्यरत असणारे ‘क्रेडिट ब्युरो’ हे बँकिंगसेवेचा लाभ घेणा-या मध्यमवर्गीय ग्राहकांचीच माहिती देण्याबाबत आपली कार्यकक्षा मर्यादित ठेवतात, असे साधारणपणे आढळते.

कर्जदारांची माहिती उपलब्ध असायला हवी आणि याबाबत कृती न करण्याची कोणतीही सबब सांगण्यात येऊ नये, असे मत काही प्रतिसादकांनी नोंदवले आहे. अलीकडच्या काळातील वित्तीय संकटाच्या वेळी कर्जदारांचा पूर्वेतिहास माहिती असणे आवश्यक आहे ही बाब अधोरेखित झाली असेही नमूद करण्यात आले आहे. संधींचा विचार करता ‘क्रेडिट ब्युरों’ची स्थापना याला तिस-या क्रमांकाचे मानांकन देण्यात आले आहे. तर, अडथळ्यांच्या संदर्भात याला ६ व्या क्रमांकाचे मानांकन देण्यात आले आहे. ‘क्रेडिट ब्युरों’बाबत राष्ट्रीय ओळखपत्र हा एक महत्त्वाचा दस्तऐवज मानला गेला आहे. पूर्व आफ्रिका आणि दक्षिण आशिया या भागांतून राष्ट्रीय ओळखपत्राबाबतचा मुद्दा महत्त्वाचा मानला गेलेला आढळतो. ‘क्रेडिट ब्युरो’ ही केवळ संरक्षक उपाययोजना नाही तर, अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना अधिक रास्त दरात वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही त्याचा विचार केला पाहिजे, असे मत प्रतिसादकांकडून व्यक्त करण्यात आले आहे. वित्तीय सेवांच्या पुरवठ्यातील धोके टाळून चांगली वित्तीय सेवा देण्याचा प्रयत्न ‘क्रेडिट ब्युरों’मधील माहितीच्या आधारे करता येणे शक्य बनावे. ‘क्रेडिट ब्युरों’ची स्थापना केल्याने या संदर्भातील व्यापारी ‘मॉडेल’मध्ये काही बदल घडून येण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.



## (६) ग्राहक संरक्षण

वित्तीय सेवांच्या संदर्भात लघुवित्त संस्थांचा बचतकेंद्री दृष्टिकोण हा एक अडथळा मानला गेला आहे. भारत (आंध्रप्रदेश), निकाराग्वा, मोरोक्को, बोस्निया येथील काही लघुवित्त संस्था/ संस्थांचे ग्राहक काही कारणाने अडचणीत आले होते. तो अनुभव लक्षात घेऊन सर्वसमावेशक वित्तीय सेवांच्या संदर्भात अडचणींचा विचार अधिक व्यापक दृष्टिकोणातून करण्यात येतो आहे. लघुवित्त संस्थांचा बचतकेंद्री दृष्टिकोण हा अडचणीचा ठरत असल्याचे नोंदण्यात आले आहे. अर्थात, या सर्वेक्षणाचा विषय लघुवित्तसंस्थांच्या वात्यांच्या ग्राहकांच्या अडचणी हा नव्हता तरी प्रतिसादकांच्या मनात तो विषय असल्याचे निदर्शनास आले. विशेषतः, ग्राहकांच्या हिताचे संरक्षण करण्यासंदर्भातील अडथळे व संधी यांचा विचार करता प्रतिसादकांनी लघुवित्तसंस्थांच्या विद्यमान कामकाजावरून मते मांडली असे दिसते.

ग्राहकांना अपुरे असलेले संरक्षण, राजकीय हस्तक्षेप आणि अनुचित व्यापारी पद्धतींचा अवलंब या मुद्दयांकडे प्रतिसादकांनी लक्ष वेधले. लाखो नागरिकांना कर्जाची गरज आहे यावर फार जास्त प्रमाणात लक्ष केंद्रित करण्यात आले आणि लघुवित्त संस्थांची वाढ मोठ्या प्रमाणावर घडावी यासाठी प्रयत्न करण्यात आले. पण त्यांच्या जबाबदा-या आणि कामांतील पारदर्शकता यांवर जेवढा भर द्यायला पाहिजे होते तेवढा देण्यात आला नाही (त्यामुळे ग्राहकांचे नुकसान झाले), या त्रुटी आता दूर केल्या पाहिजेत, असे मत मांडण्यात आले आहे. वंचित घटकांसाठी आपण कार्य करतो असे म्हणून ग्राहकांना नको असलेल्या वित्तीय सेवा देण्याचा उपयोग होत नाही. ग्राहकांना काय हवे आहे ते समजून घेणे व त्या सेवा उपलब्ध करून देताना ग्राहक अडचणीत येणार नाहीत हे पाहणे गरजेचे आहे. भविष्यकाळात संकटे उभी ठाकू नयेत यासाठी ‘क्रेडिट ब्युरों’ची स्थापना, ग्राहकांसाठी वित्तीय शिक्षण, ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन विविध प्रकारच्या वित्तीय सेवा उपलब्ध करून देणे आणि ग्राहक संरक्षण नियमने आखणे या बाबींचा सर्वंकष विचार करण्याची गरज प्रतिसादकांनी मांडली आहे. वित्तीय सेवा पुरवठादारांपेक्षा अन्य प्रतिसादकांनी ग्राहक संरक्षणाला अधिक प्राधान्य दिल्याचे आढळले.

### (७) लघुवित्त संस्थांसंदर्भातील नियमनांची अपुरी चौकट

सर्वसमावेशक वित्तीय सेवांच्या संदर्भातील संधींचा विचार करता लघुवित्त संस्थांचे सुधारित नियमन व देखरेख या मुद्दयाला ८व्या क्रमांकाचे सर्वसाधारण मानांकन देण्यात आले आहे. तर, अडथळ्यांचा विचार करता वित्तीय संस्थांसंदर्भातील नियमनांची अपुरी चौकट याला ८ व्या क्रमांकाचे सर्वसाधारण मानांकन देण्यात आले आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे लघुवित्त संस्थांमध्ये सहभागी असलेल्या प्रतिसादकांनीच नियमनांची मागणी केली आहे. वित्तीय सेवा देणा-यांवर नियमने आणि ग्राहकांना संरक्षण अशा दोन बाबी महत्त्वाच्या असून त्याबाबत योग्य कृती झाली तर त्यामागे कायद्याचे पाठबळ आहे असे स्पष्ट होईल. नियमने असली तर लघुवित्त संस्थांच्या होणा-या अनियंत्रित वाढीवर जरा मर्यादा येतील आणि वित्तीय बाजारपेठेसाठीही ते उपयुक्त व फायदेशीर ठरेल, असे मत काहींनी नोंदवले. स्व-नियमनांचा मार्ग उपयुक्त ठरू शकतो पण बँकिंग व्यवस्थेद्वारे जारी केल्या जाणा-या नियमनांना तो सक्षम पर्याय ठरत नाही. लघुवित्त संस्थाकडून स्व-नियमनांचा वापर करण्यात आला तर त्यांच्यासाठी तो समजूतदारपणाचाच ठरेल. स्व-नियमनांचे ध्येय (ग्राहकांचे) कर्जबाजारीपण टाळण्याकडे आणि (ग्राहकांचे) नुकसान न होऊ देण्याकडे असायला हवे. तसेच, लघुवित्त संस्थांची पावले सातत्यशील बँकिंगच्या दिशेने पडू शकतील का, या संदर्भातील चर्चा पुढे नेण्यासाठी त्यांचा उपयोग होऊ शकेल. या संदर्भात काही प्रतिसादकांनी मोबाइल बँकिंगचाही उल्लेख केला. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे मोबाइल बँकिंग ही एक महत्त्वपूर्ण घटना ठरत असून त्या संदर्भातील नियमनेही अद्याप आखण्यात आलेली नाहीत, याकडे लक्ष वेधण्यात आले आहे. तसेच, त्यामुळे लघुवित्त संस्थांना स्व-नियमने आखण्याची संधी उपलब्ध झाली आहे, असे प्रतिसादकांनी नमूद केले आहे.

### (८) लघुवित्तसंस्थांना पुरविण्यात येणारा निधी आणि अन्य अपेक्षित बदल

लघुवित्तसंस्थांबाबत पूर्वी काही मुद्दे महत्त्वाचे मानले जात होते. लघुवित्तसंस्थांच्या कामकाजात अपेक्षित बदल, गुंतवणूकदारांसाठी सुयोग्य बाजारपेठ, व्यापारी बँकांनी किमान काही टक्के निधी हा अल्प उत्पन्न



गटातील नागरिकांना कर्जरूपाने देणे असे काही मुद्दे पूर्वी चर्चेत होते. आता हे मुद्दे तितकेसे महत्त्वाचे ठरत नसून त्यांचा प्राधान्यक्रम मागे सरकला आहे, असे प्रतिसादकांच्या प्रतिसादावरून दिसून येते. लघुवित्त संस्था पूर्वी 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर कार्य करत होत्या. पण गेल्या दोन दशकांत त्यांचे उद्दिष्ट बदलले असून त्या व्यापारी तत्त्वानुसार नफा मिळवण्यासाठी कार्य करतात असे आढळते.

### (९) सरकारी हस्तक्षेप टाळण्याकडे कल

सर्वसमावेशक बँकिंगच्या कक्षा विस्तारण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील व देणगीदार संस्थांनी अधिकाधिक कृतीशील बनावे असे पूर्वी म्हटले जात असे. पण त्यांनी आता नियमनांबाबतच आपली भूमिका मर्यादित ठेवावी असे सर्वसाधारणतः प्रतिसादकांचे मत असल्याचे आढळते. अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना सरकारच्या तिजोरीतून विविध योजनांद्वारे मिळणा-या रोख रकमेच्या हस्तांतरणाबाबत सरकारची भूमिका महत्त्वाची ठरते. सरकारकडून मिळणारी रोख रक्कम अल्प उत्पन्न गटातील नागरिकांच्या खात्यात थेट जमा होण्याने नागरिकांची आत्मनिर्भरता वाढण्याच्या दृष्टीने व वित्तीय सेवांचा उपयोग करण्याच्या दृष्टीने नागरिकांची सक्षमता वाढण्यास मदत होऊ शकते. अशा नागरिकांनी किमान काही बचत करावी यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळू शकते. अर्थात, वित्तीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी असे उपक्रम अत्यावश्यक नसले तरी साहाय्यकारी ठरू शकतात असे मत काहींनी मांडले आहे. शिवाय, लघुवित्त संस्थांनाही अशा उपक्रमांचे अप्रत्यक्ष फायदे होऊ शकतात. म्हणजे, निधी उपलब्ध करुन देण्याचा स्रोत लघुवित्त संस्थांकडे नसला तरी सरकारच्या अशा योजनांचे लाभार्थी लघुवित्त संस्थांचे ग्राहक बनू शकतात. वित्तीय सेवा पुरविणा-या संस्था, गुंतवणूकदार आणि अन्य संस्था यांनी कोणकोणत्या वित्तीय सेवा ग्राहकांना उपलब्ध करून द्याव्यात हे मात्र सरकारांनी ठरवू नये, असेही प्रतिसादकांनी म्हटले आहे. सर्वसमावेशक बँकिंगची चर्चा जगभरात कसकशा प्रकारे चालू आहे, त्याचा अंदाज या सर्वेक्षणातील मुद्द्यांवरून येतो. अल्प उत्पन्न गटातील नागरिकांना वित्तीय सेवा देण्याची गरज सर्वदूर मांडली जाते आहे, हे चित्र यातून स्पष्ट होते.

## आशिया

सर्वसमावेशक बँकिंगच्या संदर्भात आशियातील चित्र समजून घेणे उद्‌बोधक आहे. फिलिपिन्स आणि कंबोडिया येथील लघुवित्त संस्थांचे जाळे विस्तारते आहे. भारतातील काही लघुवित्तसंस्थांच्या कारभारासंदर्भात २०१०-११ मध्ये काही प्रश्न उपस्थित झाले होते. वित्तीय क्षेत्राचा विस्तार होऊन वित्तीय सेवा सर्वांपर्यंत पोहचाव्यात या दिशेने काही पावले उचलण्याचा प्रयत्न अलीकडे होतो आहे. चीनमध्ये सरकारच्याच हाती सर्वकाही असल्याने तेथील मुद्दे वेगळे ठरतात. सर्वसमावेशक बँकिंगच्या संदर्भातील संधी आणि अडथळे याबाबत आशियातील व भारतातील नागरिकांचा मिळालेला प्रतिसाद पुढील पानावरील तक्त्यात देण्यात आला आहे.

फक्त आशियातील नागरिकांनी वित्तीय संस्थांसंदर्भातील नियमनांची अपुरी चौकट या मुद्याला अडथळ्यांच्या यादीत पहिल्या क्रमांकाचे मानांकन दिले आहे, असे या सर्वेक्षणातून दिसून आले. काही ठिकाणी या परिस्थितीत बदल करण्याचे प्रयत्न चालू आहेत. 'क्रेडिट ब्युरों'ची स्थापना करणे फिलिपिन्समध्ये कायद्याने बंधनकारक करण्यात आले आहे. ग्रामीण भागांतील नागरिकांची बचत हा मुद्दादेखील आशियातील काही प्रतिसादकांनी संधींच्या यादीत समाविष्ट केला आहे. वित्तीय सेवांचा विस्तार वाढवणे हा मुद्दा बहुतांश देशांमध्ये संधींच्या यादीत वरचे मानांकन मिळवून आहे. मोबाइल फोन बँकिंगची चर्चाही काही देशांमध्ये चालू आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे भारतातील प्रतिसादकांनी राजकीय हस्तक्षेप हा सर्वांत मोठा अडथळा असल्याचे नोंदवले आहे. वित्तीय संस्थांसंदर्भातील नियमनांची अपुरी चौकट हा मुद्दाही भारतात अडथळयांच्या यादीत वरचे मानांकन मिळवून आहे. वित्तीय साक्षरतेची वानवा हा देखील एक अडथळा आहे. आंध्रप्रदेशातील बचतगटांच्या कामकाजाबाबत उद्‌भवलेल्या प्रश्नामुळे तेथील ग्राहकांची कोंडी झाली होती व तेथील ग्राहकांना मोठ्या अडचणीला सामोरे जावे लागले होते. ही पार्श्वभूमी भारतीय प्रतिसादकांच्या मनात असावी असे त्यांच्या प्रतिसादावरून दिसून येत असल्याचे अभ्यासकांनी म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहक संरक्षण नियमने आणि वित्तीय शिक्षण हे मुद्दे भारतात संधींच्या यादीत वरचे मानांकन मिळवून आहेत.



### आशियातील प्रतिसादकांची मते

| संधी | अडथळे |
|---|---|
| (१) लघुवित्त संस्थांचे सक्षमीकरण | (१)वित्तीय संस्थींसंदर्भातील नियमनांची अपुरी चौकट |
| (२)वित्तीय सेवांचे वैविध्य वाढवणे | (२)वित्तीय साक्षरतेची वानवा |
| (३)कर्जदारांची माहिती देणारे 'ब्युरो' | (३)ग्राहकांच्या गरजांबाबतचे मर्यादित आकलन |
| (३) वित्तीय शिक्षण | (४)राजकीय हस्तक्षेप |
| (५) ग्राहक संरक्षण नियमने | (५) कर्ज 'ब्युरों'ची वानवा |
| (६) मोबाइल (फोन) बँकिंग | (६)लघुवित्त संस्थांच्या मर्यादित संस्थात्मक क्षमता |
| (७)सर्वसमावेशक वित्तीय संस्था | (७) अपुरे ग्राहक संरक्षण |
| (८)लघुवित्तसंस्थांचे सुधारित नियमन व देखरेख | (८)लघुवित्तसंस्थांचा फक्त बचतकेंद्री दृष्टिकोण |
| (९)राष्ट्रीय ओळखपत्र | (९) अपु-या पायाभूत सेवासुविधा |
| (१०)ग्रामीण भागातील नागरिकांची बचत/बचतगट | (१०) शाखा चालवण्याचा खर्च |

### भारतातील प्रतिसादकांची मते

| संधी | अडथळे |
|---|---|
| (१)वित्तीय सेवांचे वैविध्य वाढवणे (७२) | (१) राजकीय हस्तक्षेप (७२)* |
| (१) वित्तीय शिक्षण (७२) | (२) वित्तीय संस्थांसंदर्भातील नियमनांची अपुरी चौकट (६१) |
| (३)ग्राहक संरक्षण नियमने (६७) | (२) लघुवित्तसंस्थांचा फक्त बचतकेंद्री दृष्टिकोण (६१) |
| (४)लघुवित्त संस्थांचे सक्षमीकरण (६१) | (४) कर्ज 'ब्युरों'ची वानवा (५६) |
| (४)कर्जदारांची माहिती देणारे 'ब्युरो' (६१) | (४) वित्तीय साक्षरतेची वानवा (५६) |

टीप -*कंसातील संख्या त्या त्या मुद्याला पहिल्या दहांत मानांकन देणा-यांची एकूणांतील टक्केवारी दर्शवते.

सर्वसमावेशक बँकिंगच्या संदर्भात करण्यात आलेल्या या सर्वेक्षणातील मुद्यांचा विचार देशोदेशीचे धुरीण करतील व वित्तीय सेवांचा विस्तार घडवून आणतील अशी आशा करता येईल. ■■

सामाजिक

# रस्ते वाहतूक आणि सुरक्षा विधेयक - २०१४

## चिकित्सा अंतरंगाची - भाग २

**- प्रसन्न पटवर्धन** (वाहतूक व्यावसायिक)

वाहतुकीच्या क्षेत्रात कोणतीही सेवा सुरू करण्यापूर्वी कोणत्या प्रकारच्या कार्यपद्धतीचा अवलंब केला जाणे आवश्यक आहे त्या कार्यपद्धतीचे विवरण प्रस्तावित विधेयकामध्ये तपशीलवारपणे केलेले आहे. कोणतीही विविक्षित सेवा पुरवण्यासंदर्भातील नियोजन कशा पद्धतीने करण्यात यावे, त्यांत अंतर्भूत असणा-या योजनांची आखणी व ऐलान कशा प्रकारे केले जावे, संबंधितांना परवाने अदा करण्याची पद्धती काय असली पाहिजे, सेवा एकदा कार्यरत झाल्यानंतर तिच्या माध्यमातून सातत्यशील व सुसंघटित अशी प्रवासी वाहतुकीची सुविधा समूर्त होण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या पायाभूत सेवासुविधांचा विकास ती ती सेवा सुरू होण्यापूर्वीच कशा प्रकारे करण्यात यावा... अशा नाना बाबींचा ऊहापोह या दस्तऐवजात केलेला पाहावयास मिळतो. ही एक अतिशय स्वागतार्ह गोष्ट ठरते. वाहतूक सेवेचा दर्जा उंचावणे, वाहतुकीच्या सेवा पुरविणा-या जाळ्याचा विस्तार घडून येणे हे तर त्यांमुळे साध्य होईलच. परंतु, सर्वांत मुख्य म्हणजे, वाहतूक व्यवस्थेतील काही मार्गांवर सेवांची भाऊगर्दी आणि काही मार्गांवर मात्र सेवांचा पूर्ण ठणठणाट असे विसंगतीपूर्ण चित्र त्यांमुळे दिसणार नाही, अशी अपेक्षा धरता येईल. चांगल्या दर्जाच्या रस्त्यांची निर्मिती भविष्यात केली जाण्याची हमी मिळावी, या संदर्भातील तरतुदी तर या विधेयकामध्ये आहेतच. परंतु, रस्तेमार्गांचा वापर करणा-या सर्वच घटकांना गरज भासणा-या काही किमान समान पायाभूत सेवासुविधांची उपलब्धता करून दिली जाण्याचा विश्वास देणा-या काही तरतुदीही या विधेयकातील एका प्रकरणात बघावयास मिळतात. त्या साठी पायाभूत सेवासुविधांचा परामर्श घेणारे एक स्वतंत्र प्रकरणच विधेयकामध्ये सादर करण्यात आलेले आहे.



प्रवासामध्ये असणा-या वाहनांना विश्रामथांब्यांवर उभे राहण्यास आवश्यक असणारी जागा व वाहनांतील प्रवाश्यांना आनुषंगिक सुविधा पुरविण्याबाबतची जबाबदारी मोटर परिवहन कायद्यामध्ये १९८८ साली करण्यात आलेल्या सुधारणांद्वारे (कलम १७७) शासनावर सोपविण्यात आलेली असली तरी तिचे स्वरूप ऐच्छिक होते. परंतु, नवीन विधेयकामध्ये पायाभूत सेवासुविधांसंदर्भातील जे स्वतंत्र प्रकरण आहे त्यांत मात्र या बाबतीत एक अतिशय महत्त्वाचा बदल सुचविलेला दिसतो. विविध प्रकारच्या वाहनांसाठी विश्रामथांबे निर्माण करणे, प्रवासात असलेली वाहने व गाड्या उभ्या करण्यासाठी पुरेशा जागेची तरतूद करणे, विश्रामगृहांच्या सुविधा पुरवणे, प्रवाशांच्या सोयींचा विचार करून शहरांमध्ये थांबे निर्माण करणे... अशांसारख्या सुविधांचा पुरवठा करण्याची जबाबदारी विविध साधनांद्वारे होणा-या वाहतुकीचे संनियंत्रण व सुसूत्रीकरण घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर स्थापन करण्यात यावयाच्या प्राधिकरणाकडे या विधेयकाने सोपविलेली आहे. मुख्य म्हणजे, अशा सर्व आनुषंगिक सेवासुविधा पुरवणे हे त्या प्राधिकरणाला बंधनकारक असणार आहे. वाहने आणि प्रवासी या दोघांचीही सोय यांमुळे होणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील प्राधिकरणाने अशा प्रकारचे नियोजन वाहतूक व्यावसायिक, कंत्राटदार तसेच वाहतुकीशी संबंधित असणा-या स्थानिक आणि राज्यस्तरीय अधिकारयंत्रणांशी सुसंवाद व समन्वय साधून अंमलात आणावयाचे आहे. आपल्या देशात कार्यरत असणा-या विमानतळांच्या धर्तीवर, अत्याधुनिक अशी बसवाहतूक केंद्रे या सर्व प्रक्रियेद्वारे आपल्या भूपृष्ठीय वाहतूक व्यवस्थेमध्ये भविष्यात विकसित होतील, अशा प्रकारचा आशावाद यां सगळ्यांमुळे मनात जागतो. रस्त्यांच्या माध्यमातून वाहतुकीची सेवा पुरविणारी यंत्रणा ही खासगी आहे की सरकारी, अशा प्रकारचा कोणताही भेदभाव न करता अशी अत्याधुनिक बसवाहतूक केंद्रे सर्व संबंधितांना काही किमान समान सेवा पुरवत राहतील. केवळ इतकेच नाही तर, मालवाहतुकीसाठीही अशाच प्रकारच्या अत्याधुनिक केंद्रांचे जाळे संपूर्ण देशात विकसित करण्याचाही मानस या विधेयकामध्ये नमूद केलेला आहे. जहाजवाहतूक, हवाईवाहतूक व रेल्वे या तीन मंत्रालयांशी सुसंवाद आणि सुसूत्रीकरण प्रस्थापित करत अशी केंद्रे कार्यरत बनवण्याचा

प्रस्ताव आहे. वाहतुकीच्या विविध माध्यमांद्वारे केल्या जाणा-या मालवाहतुकीचे सुलभ आणि कार्यक्षम एकत्रीकरण व जुळणी त्यांमुळे शक्य बनावी. परिणामी, मालवाहतुकीसाठी लागणारा वेळ आणि येणारा खर्च या दोहोंतही बचत व्हावी. भारतीय बनावटीच्या वस्तूंची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मकता उंचावणे यांमुळे शक्य बनेल.

मोटर वाहन कायद्यातील प्रकरण सहामध्ये १९८८ साली करण्यात आलेल्या सुधारणांमुळे राज्य परिवहन मंडळांना काही एक विशेष दर्जा बहाल करण्यात आलेला होता. परंतु, प्रस्तावित विधेयकामध्ये सूचीत करण्यात आलेल्या वाहतूकविषयक नियमनव्यवस्थेनुसार राज्य परिवहन मंडळांना बहाल करण्यात आलेली विशेष दर्जाची ती तरतूद खालसा करण्यात आलेली आहे. वाहतूक सेवा पुरविण्याच्या क्षेत्रात कार्यरत असणा-या सर्वच घटकांना परस्परांशी समान तत्त्वांवर स्पर्धा करता येईल अशा प्रकारची व्यवस्था निर्माण करणे, हे या प्रस्तावित विधेयकाचे जे एक उद्दिष्ट आहे, त्याच्याशी सुसंगत अशीच ही तरतूद होय. किंबहुना, मोटर वाहन कायद्यातील त्या प्रकरणाच्या जागी प्रस्तावित विधेयकामध्ये प्रवासी वाहतुकीसंदर्भातील एक नवीन प्रकरणच समाविष्ट करण्यात आलेले आहे. राज्य परिवहन मंडळांच्या जोडीनेच प्रवासी वाहतुकीसंदर्भातील सर्व प्रकारचे परवाने खासगी प्रवासी वाहतूकदारांनाही उपलब्ध करून देण्यात येतील अशा प्रकारची तरतूद या नवीन प्रकरणामध्ये सुचविण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे, 'स्टेज कॅरेज' आणि 'कॉन्ट्रॅक्ट कॅरेज' यांसारख्या संकल्पनांच्या धूसर व्याख्यांसंदर्भात सर्वच संबंधितांना अधिक स्पष्टता यावी या हेतूने या संज्ञांच्याऐवजी प्रस्तावित विधेयकामध्ये 'शेड्यूल सर्व्हिसेस्', 'चार्टर सर्व्हिसेस्' आणि 'मीटर्ड सर्व्हिसेस्' अशा प्रकारच्या नवीन संज्ञा-संकल्पना अंतर्भूत करण्यात आलेल्या आहेत. या संकल्पनांच्या अंतर्गत असणा-या पोटविभागांच्या व्याख्यादेखील अधिक सुस्पष्टपणे प्रस्तावित विधेयकामध्ये मांडण्यात आलेल्या दिसतात. वाहतुकीच्या क्षेत्रातील प्रत्येक प्रकारच्या सेवेची सुस्पष्ट व्याख्या करणे यांमुळे आता शक्य बनावे. संज्ञासंकल्पनांबाबत सध्या प्रचलीत असणा-या गोंधळाचे निराकरण त्यांमुळे घडून यावे. एखाद्या विशिष्ट व्यक्ती अगर वाहतूक सेवा पुरवठादाराच्या पथ्यावर पडेल अशा



पद्धतीने विविध संकल्पनांचे अयथार्थ वा दिशाभूल करणारे स्पष्टीकरण अथवा अन्वयार्थ लावला जाण्याच्या शक्यता त्यांमुळे कमी व्हाव्यात. तसेच, या सगळ्यांपायी पूर्वी केव्हा तरी न्यायालयांनी काढलेले आदेश रद्दबातल ठरणे अथवा केले जाणेही शक्य बनेल. राज्य परिवहन सेवा आणि खासगी वाहतूकदार यांच्यादरम्यान निकोप स्पर्धा निर्माण होण्याची हमी यांमुळे मिळावी. या आधी दूरसंचार सेवेच्याबाबतीत आपल्या देशात नेमके असेच काहीसे घडलेले आहे. अशी स्पर्धा व्यवहारात समूर्त बनली तर वाहतूक क्षेत्राच्या ते एकंदरीनेच पथ्यावर पडेल. या क्षेत्राच्या वाढविस्तारास त्यांमुळे चालना मिळेल. प्रवाशांना रास्त दराने सेवा मिळू शकेल आणि त्याच वेळी वाहतूक सेवेची गुणवत्ताही उंचावेल.

वाहतूक सेवेच्यासंदर्भात केवळ दोनच परवाने अदा केले जावेत, असे या विधेयकामध्ये प्रस्तावित करण्यात आलेले आहे. एक असेल देश पातळीवरील 'राष्ट्रीय परवाना' तर दुसरा असेल राज्य स्तरावरील 'राज्य परवाना'. हे परवाने अदा करण्यासंदर्भात कोणती कार्यपद्धती अवलंबली जावी, यांबाबतही विधेयकात पुरेसे स्पष्टीकरण सापडते. एखाद्या प्रदेशात अथवा एखाद्या मार्गावर एखाद्या योजनेंतर्गत वाहतूक सेवा पुरवण्यासंदर्भात परवाना अदा करावयाचा असेल तर त्याबाबतचे संपूर्ण पूर्वनियोजन संबंधितांनी करणे या विधेयकाद्वारे आता अनिवार्य ठरविण्यात आलेले आहे. स्थानिक स्तरावरील, राज्य स्तरावरील व राष्ट्रीय स्तरावरील वाहतूक प्राधिकरणाने ते कोणकोणत्या प्रदेशात अथवा त्या प्रदेशातील कोणकोणत्या मार्गांवर सेवा पुरवणार त्या संदर्भातील नियोजन करणे अपेक्षित आहे. हे नियोजन करत असताना पोलीस, भूविकास अधिकार यंत्रणा, स्थानिक स्तरावर कार्यरत असणारे वाहतूक सेवा पुरवठादार अशांसारख्या स्थानीय स्तरावरील अधिकारयंत्रणांशी या प्राधिकरणांनी सुयोग्य सुसंवाद व चर्चामसलत करणेही अपेक्षित आहे. राज्याराज्यांदरम्यानच्या वाहनव्यवहाराशी संबंधित विविध योजनांना मान्यता देण्याचे अधिकार राष्ट्रीय स्तरावरील वाहतूक व बहुविध वाहतूक सुसूत्रीकरण प्राधिकरणाकडे या विधेयकाद्वारे सुपूर्त करण्यात आलेले आहेत. तर राज्याराज्यांत कार्यरत व्हावयाची वाहतूक व बहुविध वाहतूक सुसूत्रीकरण प्राधिकरणे त्या त्या राज्यातील वाहनव्यवहाराशी

संबंधित योजनांना मान्यता देतील, अशी तरतूद प्रस्तावित विधेयकामध्ये करण्यात आलेली आहे. ही व्यवस्था व्यवहारात लागू होण्याचे फायदे दोन. एक तर, एकाच परिसरात आणि/अथवा एकाच मार्गावर एकापेक्षा अधिक वाहतूक पुरवठादारांनी सेवा पुरवण्याने होणारी पुनरावृत्ती टळेल. दुसरे म्हणजे, स्थानिक स्तरावरील वाहतूक यंत्रणा व राज्यस्तरीय वाहतूक यंत्रणा यांच्या हितसंबंधांना छेद बसण्याचा प्रसंगच उद्‌भवणार नाही. त्या त्या प्रदेशात वाहतुकीची सुविधा पुरवण्यासाठी पात्र ठरलेल्या अथवा निवडल्या गेलेल्या वाहतूकदार संस्थेला वाहतूक योजनेनिहाय परवाने अदा करणे, हेच काय ते काम मग या योजनेच्या अंमलबजावणीशी निगडित असलेल्या अधिकारपदस्थांना उरेल. मोटर वाहन कायद्यात १९८८ साली करण्यात आलेल्या दुरुस्तीनुसार, प्रादेशिक परिवहन कार्यालयाला अंमलबजावणी यंत्रणा म्हणून निर्देशित करण्यात आलेले होते. आता, प्रस्तावित विधेयकामध्ये ज्या प्रकारे निर्देशित केलेले असेल, त्याला अनुसरून अंमलबजावणीसाठी एक नवीन यंत्रणा वा व्यवस्था राज्य सरकार कार्यान्वित करेल.

वाहतुकीचे नियमन कार्यक्षम पद्धतीने केले जाण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून रस्त्यांवरील अपघात आणि गुन्हे यांच्या संदर्भातील एकात्म व्यवस्था निर्माण वापरात आणल्या जाव्यात, असे या नवीन विधेयकामध्ये सुचविण्यात आलेले आहे. त्यासाठी, रस्त्यांवर धावणारी वाहने व ती वाहने चालवणारे चालक यांच्या हातून घडणारे अपघात आणि/अथवा केले जाणारे गुन्हे प्रमाणित पद्धतीने नोंदवणारी एक केंद्रीय प्रणाली राष्ट्रीय प्राधिकरणाने विकसित करावयाची आहे. रस्त्यांवरील वाहतूक सुरक्षित बनण्याची हमी सर्व संबंधितांना मिळावी या दृष्टीने अशा एकात्म व्यवस्थांतर्गत अनेक प्रकारच्या तरतुदी प्रस्तावित आहेत. वाहनांची सुरक्षा तसेच दृष्यमयता जपण्यासाठी वापरण्यात येणा-या साधनांच्या अवैध विक्रीस बंदी जारी करणा-या एका तरतुदीचा निर्देश या संदर्भात इथे करता येईल. वाहने आणि वाहनचालक यांच्या सुरक्षिततेसंदर्भात वापरण्यात येणा-या संरक्षक साधनांची विक्री राष्ट्रीय प्राधिकरणाच्या मंजुरीखेरीज एकाही वाहन उत्पादकास करता येणार नाही, अशीही एक तरतूद अनिवार्य



म्हणून लागू करण्याचा प्रस्ताव आहे. संरक्षक पट्ट्याचा वापर मोटरीमध्ये मागील आसनावर बसून प्रवास करणा-या प्रवाश्यांना तसेच बसमधून प्रवास करणा-या प्रवाशांनाही अनिवार्य करण्याची तरतूद नवीन विधेयकामध्ये सुचविण्यात आलेली आहे. मुख्यतः निवासी प्रभागांतील रस्त्यांवरील रहदारी अथवा वाहतुकीसंदर्भात काही काही ठिकाणी जारी करण्यात आलेल्या मर्यादांबाबतीत तसेच 'विशेष' मुलांच्या संदर्भातील काही खास तरतुदीही या विधेयकामध्ये मांडण्यात आलेल्या आहेत. वाहनांच्या वेगावरील मर्यादांसंदर्भात लागू केल्या जाणा-या तरतुदींचे पालन अधिक काटेकोरपणे व कडक पद्धतीने केले जावे, असेही प्रस्तावित आहे. केवळ इतकेच नाही तर, महत्त्वाच्या आणि अति महत्त्वाच्या व्यक्तींना घेऊन जाणारी वाहने एखाद्या रस्त्यावरून जात असताना त्याच मार्गाने रुग्णवाहिकाही जात असेल तर, रुग्णवाहिकेला प्राधान्य दिले जावे, अशा प्रकारच्या तरतुदींचाही समावेश नवीन विधेयकामध्ये करण्यात आलेला दिसतो. मालाची वाहतूक करणा-या वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक माल भरण्यास प्रतिबंध करण्याचे अधिकार त्या त्या मार्गावर पथकराची वसुली करणा-या यंत्रणेकडे

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

**तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ**

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

सोपविण्याचा मानस या विधेयकामध्ये व्यक्त केलेला आहे. तर, पथकरमुक्त मार्गांवर हे अधिकार संबंधित अधिका-यांकडे राहतील. एखाद्या वाहनास, समजा, अपघात झालाच तर; संबंधित वाहनाचा चालक, जखमींवर उपचार करणारे डॉक्टर, पोलीस अधिकारी आणि विमा कंपनी अशा विविध संबंधित घटकांच्या कर्तव्यांचे स्पष्ट निर्देशन विधेयकामध्ये करण्यात आलेले आहे. रस्त्यावरून जाणा-या अथवा चालणा-या एखाद्याला धडक मारून संबंधित वाहनचालक पसार होण्याच्या घटना प्रत्यही घडत असलेल्या आपण पाहतो. धडक बसून जखमी अवस्थेत पडलेल्या व्यक्तीवर अपघातानंतर लगेचच्या तासाभरात वैद्यकीय उपचार केले जाणे, अत्यंत गरजेचे असते. अशा वेळी, त्या काळात जखमी व्यक्तीला लगोलग वैद्यकीय उपचारांचा लाभ मिळावा यांसाठी ते उपचार विनाशुल्क पुरविण्याचे कवच विमा कंपन्यांनी पुरवावे यांसाठी तशा रकमांची भरपाई विमा कंपन्यांना देण्यासाठी एक खास निधी निर्माण करण्याची योजनाही या विधेयकामध्ये मांडण्यात आलेली आहे. सगळ्यांत महत्त्वाचे म्हणजे, अपघातासंदर्भातील विम्याचे दावे ताबडतोबीने आणि काही एका निश्चित कालखंडात निकालात निघावेत त्या दृष्टीने अशी कालमर्यादाही या विधेयकाने निश्चित करावयाची आहे. रस्त्यांवर घडणा-या अपघातांसंदर्भात विम्याचे संरक्षक कवच पुरविणा-या विमा कंपन्यांवर असणारी (नुकसानभरपाई संदर्भातील) मर्यादित जबाबदारी, हा या सगळ्या व्यूहातील तुलनेने अंमळ काळजीचा भाग ठरतो. अपघातात सापडलेल्या वाहनाचा मालक अथवा चालक यांची जबाबदारी (वाहनाच्या नुकसानीच्या संदर्भातील) ही नेहेमीच एका अर्थाने अमर्याद असते. मात्र, विम्याच्या मर्यादित जबाबदारीची तरतूद विधेयकामध्ये नसल्यामुळे अपघातग्रस्त वाहनाचा मालक अथवा वाहनचालक यांच्यासंदर्भात अडचणीची परिस्थिती उद्‌भवू शकते. कारण, अपघातग्रस्त वाहनाच्या नुकसानभरपाईची रक्कम ही उतरवलेल्या विम्यापेक्षा अधिक असेल तर त्या परिस्थितीत संबंधिताला ती भरपाई देण्यास बांधील असलेल्या वाहनचालकाला वा मालकाला ती रक्कम भरता आली नाही तर त्याला एकतर दिवाळे काढावे लागेल अथवा तुरुंगात तरी जावे लागेल. हे वास्तव ध्यानात घेता, विम्यासंदर्भातील अधिक संतुलित तरतूद विधेयकामध्ये अंतर्भूत केली जाणे अगत्याचे ठरते.



वाहतुकीला शिस्त लागावी आणि त्याच वेळी वाहतूक अधिक सुरक्षितही बनावी या हेतूने दोषींवर दंडात्मक स्वरूपाची जबर कारवाई करण्याची तरतूद प्रस्तावित विधेयकामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. केवळ इतकेच नाही तर संबंधित शिक्षेची तामिलीही तितक्याच कठोरपणे व काटेकोर पद्धतीने केली जावी, यासाठी आवश्यक त्या तरतुदी विधेयकामध्ये केलेल्या सापडतात. वाहन चालवण्याचा परवाना धारण केलेल्या चालकांकडून वाहतुकीदरम्यान घडलेल्या गुन्ह्यांची नोंदणी गुणांच्या (पेनल्टी पॉइन्ट्स्) स्वरूपात करण्याचा प्रस्ताव आहे. वाहनचालकांकडून घडलेल्या गुन्ह्याच्या स्वरूपानुसार दंडात्मक कारवाईचे स्वरूप ठरेल. त्या संदर्भातील मार्गदर्शक तत्त्वे राष्ट्रीय स्तरावरील प्राधिकरणाने निश्चित करावयाची आहेत. पैशाच्या स्वरूपातील दंड, कारावास, वाहनाची जप्ती, 'पेनल्टी पॉइन्ट्स्' नावावर चढवले जाणे, वाहन चालवण्याचा परवाना, वाहनाची नोंदणी वा मंजुरी रद्द करणे, वाहनचालकाला सक्तीचे प्रशिक्षण... अशा विविध प्रकारच्या दंडात्मक कारवाईची तरतूद विधेयकामध्ये सुचविण्यात आलेली आहे. कशा प्रकारच्या अपराधासाठी (एक वा अधिक) अशा कोणत्या प्रकारची दंडात्मक कारवाई करण्यात यावी याचा तपशील राष्ट्रीय प्राधिकरणाने निश्चित करावयाचा आहे. हातून घडलेल्या प्रत्येक अपराधादाखल संबंधित वाहनचालकाच्या परवान्यावर त्या त्या अपराधानुसार 'पेनल्टी पॉइन्ट्स्' चढवण्यात येतील. अशा 'पॉइन्ट्स्'ची संख्या त्या त्या अपराधाच्या (अथवा प्रेरणेच्या) स्वरूपानुसार ठरवण्यात यावयाची आहे. एकाच वेळी दोन परवाने धारण करणे, सदोष वाहनांच्या निर्मिती करणे, रस्त्यांचे बांधकाम तसेच देखभालदुरुस्तीदरम्यान सुरक्षेसंदर्भातील नियमांचे पालन करण्याबाबत कुचराई करणे, निर्धारित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार वाहतूक सेवेची उपलब्धता वा पुरवठा न करणे... अशांसारख्या अनियमिततांसाठीही उचित अशी दंडात्मक कारवाई या विधेयकामध्ये सुचविण्यात आलेली आहे. वाहतुकीला शिस्त लावण्याच्या संदर्भात स्थानिक नागरिकांचे सक्रिय सहकार्य घेतले जाणे बंधनकारक ठरविणा-या तरतुदींचाही इथे अंतर्भाव केलेला दिसतो. वाहतुकीदरम्यान हातून घडलेल्या अपराधाबद्दल संबंधितावर जबर दंडआकारणी व अशा जबर दंडाची वसुली संबंधिताकडून

तितक्याच कठोरपणे वसूल करण्यासंदर्भात नाना प्रकारच्या तरतुदी प्रस्तावित विधेयकामध्ये सुचविण्यात आलेल्या असल्या तरी केवळ तेवढ्यानेच भागणारे नाही. अद्ययावत अशा अनुरू प तंत्रज्ञानांचा अवलंब करत संबंधित अपराधकर्त्यापर्यंत पोहोचून, त्याला पकडून त्याच्यावर दंड ठोठवला जाण्यापर्यंतची प्रक्रिया पूर्णत्वास जात नाही तोवर अथवा ही प्रक्रिया पूर्णत्वास गेलीच नाही तर सगळ्या तरतुदी केवळ कागदावरच राहतील. पैशाच्या स्वरू पातील दंडाव्यतिरिक्त ज्या अन्य शिक्षा या विधेयकामध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत त्यांच्याबाबतीतही हाच न्याय लागू होतो. नवीन विधेयकामध्ये यांबाबत ऊ हापोह केलेला आढळतो. परंतु, आजघडीला अशा प्रकारच्या तंत्रज्ञानाचा अवलंब मुळातच आपल्या व्यवस्थेमध्ये केला जात नाही, ही खरी चिंतेची बाब होय. किंबहुना, वाहनचालक अथवा मालकांची पिळवणूक व भ्रष्टाचार यांना आपल्या व्यवस्थेमध्ये आज रान मोकळे मिळताना दिसते ते नेमके याच शबलतेपायी. संबंधिताकडून घडलेल्या अपराधाचे स्वरू प कितपत गंभीर आहे त्या नुसार त्याच्यावर करावयाच्या दंडात्मक कारवाईचा तपशील निश्चित केला जायला हवा. अपराधामुळे वाहनचालकाला आणि/अथवा अपघातात सापडलेल्या अन्य व्यक्तीला अथवा व्यक्तींना झालेल्या दुखापतींची वर्गवारी व्यवस्थितपणे केली जाणे, त्यासाठी आवश्यक ठरते. किरकोळ अपघात, गंभीर स्वरू पाचा अपघात, जीवघेणा अपघात... अशा प्रकारे अपघातांचे वर्गीकरण केले जाऊ न त्या त्या अपघातामुळे झालेल्या दुखापतींच्या व नुकसानीच्या स्वरू पानुसार दंडात्मक कारवाई केली जाण्याची व्यवस्था निर्माण करणे अगत्याचे ठरते. त्या दृष्टीने, नुकसानीच्या स्वरू पानुसार अपघाताचे गांभीर्य आणि अपघाताच्या गांभीर्यानुसार दंडात्मक कारवाईची तीव्रता यांचे व्यवस्थित कोष्टक उत्क्रांत करणे आवश्यक भासते.

एकंदरीने पाहू जाता, प्रस्तावित विधेयकातील तरतुदींचे स्वरू प चांगल्यापैकी प्रगमनशील आहे. त्यांमुळे केवळ वाहतूक क्षेत्राच्याच नव्हे तर पर्यायाने देशाच्या सुसंघटित वाढविकासास हातभार लागू शकेल. आपल्या पंतप्रधानांनी डोळ्यांसमोर ठेवलेल्या ‘मेक इन् इंडिया’ अभियानालाही त्यांमुळे चालना मिळणे शक्य बनावे. या विधेयकातील



तरतुदींच्या अंमलबजावणीमुळे आपल्या देशामध्ये निर्माण होणा-या वस्तूंच्या उत्पादन खर्चामध्ये बचत घडून येणे संभवनीय ठरते. भारतीय बनावटीच्या जिनसांची जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मकता त्यांमुळे सशक्त बनावी. या विधेयकातील तरतुदी व्यवहारात अवतरल्याने वाहतुकीच्या क्षेत्रात येत्या काळात चांगल्या दर्जाच्या सेवासुविधा व वाहने उपलब्ध होण्याची हमी सर्वसामान्य ग्राहकांना मिळून ते आश्वस्त बनतील, अशी आशा बाळगण्यास जागा आहे. रस्त्यांवरील वाहतूक भविष्यात अधिक सुरक्षित बनवण्याच्या दिशेने उचलले गेलेले एक अतिशय मोठे व सकारात्मक पाऊल, असे या प्रस्तावित विधेयकाचे वर्णन केले तर ते अनाठायी ठरणार नाही. ■■

## निवेदन

‘अर्थबोधपत्रिके’मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना ‘पत्रिके’बाबत वाटणा-या आत्मीयतेची, ‘अर्थबोधपत्रिके’च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या ‘अर्थबोधपत्रिके’च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव ‘पत्रिके’च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास ‘अर्थबोधपत्रिके’साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने ‘पत्रिके’च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे ‘अर्थबोधपत्रिके’चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. ‘अर्थबोधपत्रिके’वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

औद्योगिक

# उदारीकरण, उद्योगांचे स्थानांकन आणि वास्तव

जगाच्या आर्थिक भूगोलावरून एक नजर जरी नुसती फिरवली तरी एक बाब डोळ्यांत भरते. अर्थव्यवहारांचे आणि औद्योगिक विकासाचे अथवा भरभराटीचे पुंजके आपल्याला जगाच्या पाठीवर ठिकठिकाणी निर्माण झालेले दिसतात. अर्थउद्योगांचे केंद्रीकरण होण्याची ही प्रवृत्ती अतिशय वैशिष्ट्यपूर्ण गणली जाते. या प्रवृत्तीचा प्रादुर्भाव जगातील काहीच देशांमध्ये प्रकर्षाने दिसतो, असेही म्हणता येत नाही. हा कल सार्वत्रिक आहे. आर्थिक आणि औद्योगिक विकासाची प्रक्रिया एखाद्या देशातील अथवा प्रांतातील भूभागावर सर्वत्र समानतेने विखुरलेली आहे, असे चित्र अभावानेच दिसते. असमान वाढविकासाचे प्रमाण व तीव्रता देशादेशांनुसार बदलताना दिसते, एवढाच काय तो फरक. 'पैशाकडे पैसा धावतो' या म्हणीनुसार कोणत्या ना कोणत्या कारणाने एखाद्या ठिकाणी उगम पावलेली आर्थिक-औद्योगिक विकासाची प्रक्रिया त्या ठिकाणी केंद्रीभूत होत परिपुष्ट बनत राहते. देशादेशांतच केवळ नव्हे तर, एखाद्या देशातील वेगवेगळ्या राज्यांत अथवा भूप्रदेशांतही हाच प्रकार घडताना दिसतो. आपला देशही या परिपाठाला अपवाद नाही.

त्यांमुळे, आर्थिक व औद्योगिक विकासाच्याबाबतीत देशातील वेगवेगळ्या भागांत नांदणारी असमानता आणि असमानतेची ती दरी दिवसेंदिवस रुंदावत जाणे, हा थेट स्वातंत्र्यापासूनच आपल्या देशातील धोरणकर्त्यांच्या चिरंतन चिंतनाचा आणि चिंतेचा विषय राहिलेला आहे. आर्थिक-औद्योगिक विकासविषयक धोरणांचा भर, त्यांमुळे, आजवर मुख्यतः विकासातील प्रादेशिक असमानता दूर करण्यावर अथवा त्या असमानतेची धार कमी करण्यावरच राहिलेला दिसतो. देशातील वेगवेगळ्या भूप्रदेशावर केल्या जाणा-या सरकारी तसेच खासगी भांडवली गुंतवणुकीला दिशा देणे, हे औद्योगिक परवाना पद्धती अंमलात राखण्याचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते. देशातील तुलनेने मागास विभागांकडे भांडवलाचा ओघ वळवून त्या त्या प्रदेशांच्या आर्थिक-औद्योगिक विकासाला चालना देणे, हाच वेगवेगळ्या करसवलतींचाही एक मोठा हेतू असतो. शासनसंस्थेचे ते एक आवश्यक कर्तव्यही ठरते.



उदारीकरणाचे पर्व १९९१ सालापासून आपल्या देशात वेगाने आगेकूच करू लागले आणि शासनसंस्थेचे ते कर्तव्य अप्रस्तुत ठरले. भांडवल गुंतवणुकीच्या भौगोलिक नकाशाला आकार देण्याच्या प्रांतातून शासनसंस्था आता बाहेर पडलेली आहे. एकंदरीनेच औद्योगिक परवाना पद्धतीचा पसारा आवरता घेतला गेल्याने उद्योगांच्या अथवा भांडवली गुंतवणुकीच्या स्थानांकनासंदर्भातील परवानाधारित निर्बंध आता हटलेले आहेत. आपले भांडवल कोठे गुंतवायचे याचा निवाडा निखळ व्यावसायिक संकेतांनुसार करण्याचा अवकाश उद्योगांना यामुळे आता उपलब्ध झालेला आहे. साहजिकच, गुंतवलेल्या भांडवलावर ज्या विभागात अथवा ज्या ठिकाणी अधिक आकर्षक परतावा मिळण्याची हमी वा शक्यता दिसेल तिकडे भांडवलाचा प्रवाह वाहू लागण्याचा कल १९९१ सालानंतर सशक्त बनल्याचे वास्तव प्रकर्षाने ध्यानात येते. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या या आनुषंगिक पैलूकडे आजवरच्या वाटचालीदरम्यान फारसे काळजीपूर्वक बघितले गेलेले नाही.

या सगळ्यांमुळे शासन आणि भांडवल अथवा खासगी भांडवलदार यांच्यादरम्यानच्या पूर्वापार नात्याचा पोत आता अतिशय सूक्ष्मपणे परंतु लक्षणीयरीत्या बदललेला आहे. हा बदल मुख्यतः गुणात्मक स्वरूपाचा आहे. परवानापद्धतीचा अंमल अर्थव्यवहारात बळकट होता त्या सगळ्या कालखंडात भांडवल हा महत्त्वाचा उत्पादन घटक शासनसंस्थेचा अंकित होता. त्याच्या चलनवलनावर शासनसंस्थेच्या धोरणात्मक दृष्टीचे नियंत्रण होते. आता, उदारीकरणानंतर भांडवलाचा वरचष्मा शासनसंस्थेवर प्रस्थापित झालेला अथवा होत असलेला दिसतो. भांडवलाचा ओघ आपल्याकडे वळवण्यासाठी नाना प्रकारच्या सुविधा व सवलतींची खैरात करत भांडवलाला पायघड्या घालण्याची राज्याराज्यांमधील अलीकडील काळातील स्पर्धा शासनसंस्था आणि भांडवल यांच्यातील परस्परनात्याचा बदललेला पोत स्पष्ट करणारी आहे. उद्योगांचे आणि पर्यायाने भांडवलाचे भौगोलिक स्थानांकन अधिक संतुलित पद्धतीने होण्याची प्रक्रिया उदारीकरणानंतर मूळ धरेल, ही जी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती ती मात्र व्यवहारात समूर्त झाल्याचे अनुभवास येत नाही.

महाराष्ट्रातील चित्र नेमके हेच सांगते. राज्याच्या पश्चिम पट्ट्यातील जिल्ह्यांत अर्थ - उद्योगांचे पूर्वीपासून होत आलेले केंद्रीकरण उदारीकरणानंतर तसेच अप्रतिहत चालू असल्याचे संबंधित आकडेवारी स्पष्टपणे दर्शवते. राज्याच्या एकंदर लोकसंख्येपैकी ३३ टक्के लोकसंख्या आणि राज्यातील एकंदर बिगर शेती श्रमिकांपैकी ५६ टक्के श्रमिक पुणे-मुंबई-ठाणे-नागपूर या केवळ चार जिल्ह्यांमध्ये एकवटल्याचे अगदी २०११ सालातील जनगणनेची सांख्यिकीही सांगते. एकूणांतील ६३ टक्के नागरी लोकसंख्या आणि एकूणांतील ६६ टक्के नागरी बिगर शेती श्रमिकही याच चार जिल्ह्यांमध्ये केंद्रीभूत झालेले आहेत. ग्रामीण परिसरात उद्योगांचे विकेंद्रीकरण होण्याची प्रवृत्तीही राज्यात पुन्हा याच चार जिल्ह्यांच्या आनुषंगाने सशक्त होते आहे. मुंबईमधील जागेचा पराकोटीचा तुटवडा आणि त्यांपायी जागांचे आकाशाला भिडलेले भाव यांमुळे मुंबईची वाढ थबकते आहे. परंतु वाढविस्ताराचा तो सारा भर मुंबईशेजारच्या ठाणे आणि पुणे या दोन जिल्ह्यांकडे वळलेला पाहावयास मिळतो. त्यांमुळे, राज्यातील हेच चार-दोन जिल्हे सोडले तर बाकीच्या जिल्ह्यांमध्ये उदारीकरणानंतरच्या गेल्या दोन तपांदरम्यान डोळ्यांत भरावेत असे बदलाचे काही नवीन प्रवाह चट्दिशी वरकरणी जाणवत नाहीत. पण म्हणून सगळीकडे सगळेच थंड व स्थितीशील आहे, असेही म्हणवत नाही. औद्योगिक वाढविस्तारासंदर्भातील प्रकाशित व अधिकृत आकडेवारी बारकाईने तपासली तर राज्यातील सरासरी चित्राच्या पार्श्वभूमीवर काही जिल्ह्यांमध्ये नोंद घेण्यासारखे मोठे वैशिष्ट्यपूर्ण बदल घडत असल्याचे ध्यानात येते. नाशिक आणि जालना या दोन जिल्ह्यांचा निर्देश या संदर्भात विशेषत्वाने करता येईल.

जालना आणि नाशिक या दोन जिल्ह्यांच्या औद्योगिक नकाशावर अलीकडील काही वर्षांत घडून आलेल्या लक्षणीय बदलांचा विश्लेषक मागोवा इथून पुढे घ्यावयाचा आहे. १९९८ आणि २००५ अशा दोन वर्षी आपल्या देशात घेतली गेलेली आर्थिक गणना आणि उद्योगांच्या वार्षिक सर्वेक्षणाचे १९९८ ते २०१० या काळातील वार्षिक अहवाल यांद्वारे प्रकाशित करण्यात आलेल्या आकडेवारीला प्रत्यक्ष क्षेत्रीय पाहणीची जोड पुरवत प्रस्तुत विश्लेषणासाठी माहिती गोळा करण्यात आलेली होती.



मराठवाड्याची राजधानी गणली जाणा-या औरंगाबाद शहरापासून जालना हे शहर जवळपास ६५ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. एक मोठी व्यापारी पेठ म्हणून जालन्याचा लौकिक पूर्वापार आहे. मानवी निर्देशांकानुसार विकासाच्या शिडीवर सर्वांत तळाला असणा-या १० जिल्ह्यांमध्ये जालन्याचा समावेश होतो. जालना जिल्ह्यातील औद्योगिक विकास हा मुख्यतः जालना शहराच्या परिसरातच एकवटलेला आहे. बी-बियाणांची निर्मिती, कडधान्यांपासून डाळी तयार करणे, कापूस प्रक्रिया, तंबाखू, तेलघाण्या अशांसारखे शेतमालाशी अथवा शेती व्यवसायाशी संबंधित उद्योग जालना जिल्ह्यात पूर्वीपासून सक्रिय होते. मात्र, बांधकामांसाठी वापरल्या जाणा-या पोलादाची निर्मिती करणारे आपल्या देशातील एक अग्रेसर केंद्र म्हणून जालना शहर परिसराचा लौकिक १९९०च्या दशकाच्या अखेरपासून सर्वत्र ज्ञात होऊ लागला. नाना प्रकारच्या बांधकामांसाठी उपयोगात आणल्या जाणा-या सळ्यांचे उत्पादन करणारा केवळ एक कारखाना १९९८ सालच्या आर्थिक गणनेमध्ये दिसतो. त्या वेळी त्या कारखान्यात ६० कामगार होते. २००५ सालातील आर्थिक गणनेनुसार, बांधकामासाठी वापरल्या जाणा-या पोलादाचे उत्पादन करणारे एकंदर ३६ कारखाने जालना शहर परिसरात कार्यरत असल्याचे चित्र दिसते.

पुण्यक्षेत्र म्हणून नाशिक ब-याच शतकांपासून मशहूर आहे. हिंदुस्थान एरोनॉटिक्ससारखे सार्वजनिक क्षेत्रातील मोठे उद्योग नाशिकात होतेच. वाहने व वाहनांचे सुटे भाग, औषधे व रसायने, विजेवर चालणारी उपकरणे, प्लॅस्टिक, इलेक्ट्रॉनिक्सच्या वस्तू, सामानाच्या बॅगा.... यांसारख्या अनेकविध वस्तूंचे उत्पादन करणारे कारखाने नाशिकमध्ये पुढे यथावकाश विकसित झाले. मात्र, १९९०च्या दशकाच्या अखेरीपासून हे चित्र झपाट्याने बदलू लागले. ५०पेक्षा अधिक कामगारांना रोजगार पुरविणारे ५२३ कारखाने १९९८च्या आर्थिक गणनेनुसार नाशिकमध्ये होते. २००५ सालच्या आर्थिक गणनेनुसार हीच संख्या १६५पर्यंत घसरलेली दिसते.

जालना आणि नाशिक या दोन जिल्ह्यांच्या औद्योगिक नकाशांवर साकारलेली ही चित्रे एकमेकांपेक्षा इतकी वेगवेगळी का याचा अधिक तपशीलाने अभ्यास करणे रोचक ठरते ते या सगळ्या पार्श्वभूमीवर. ■■

### प्रमुख संदर्भ

**(A) Books/Reports -** (1) Opportunities and Obstacles to Financial Inclusion, The Center For Financial Inclusion, Washington, 2011.

**(B)Magazines -** The Economist December 6 th - 12 th 2014.

(2) Current Science Volume 107 Number 12, 25 December 2014.

■रस्ते वाहतूक सुरक्षा विधेयकाच्या अंतरंगाची चिकित्सा करणा-या प्रसन्न पटवर्धन यांच्या लेखाचा पहिला भाग जानेवारी २०१५च्या अंकात प्रसिद्ध करण्यात आलेला होता. तर, प्रा. वि. म. दांडेकर स्मृती चर्चासत्रासाठी डॉ. शरदिनी रथ यांनी तयार केलेल्या बीजटिपणातील मुद्यांचा परिचय वाचकांना डिसेंबर २०१४च्या अंकापासून करून देण्यात येत आहे. ■■

**Poverty in India**

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

**(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)**

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

**दुसरी आवृत्ती प्रकाशित**

***आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ***

**कर्ता-करविता**

**आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन**

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रुपये**



## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी** **फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी** **फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी** **फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी** **फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)

(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)

(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

# ग्रंथालयातील पुस्तके

**इतिहासातील नवे प्रवाह, संपादकः प्रा. जास्वंदी वांबूरकर, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथम आवृत्ती ऑगस्ट २०१४, पृष्ठे एक ते सोळा + १६६ किंमत, रु पये २९५/ -**

इतिहास म्हणजे भूतकाळाबाबतचे संगतवार, विश्वासार्ह साधनांनिशी केलेले तपशीलवार कथन. तो मानवी अस्तित्वाइतका पुरातन आहे. इतिहास म्हणजे लढाया, राजांच्या कहाण्या, थोरामोठ्यांची चरित्रे इतका मर्यादित अर्थ नाही. इतिहास म्हणजे मानवी विकासाची सर्वांगीण कहाणी होय. इतिहास खाद्यसंस्कृतीचा असतो आणि पर्यावरणाचाही असतो. तो प्रादेशिक असतो तसाच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीयही असतो. तो मार्क्सवादाचाही असतो आणि स्त्रीवादाचाही. इतिहासाचा सांधा वर्तमानाशी जोडलेला असतो. प्रचलीत जीवनातील अनेकानेक बाबी इतिहासाशी जोडल्या गेलेल्या असतात. वर्तमानातील अनेक घटितांचा अर्थ समजून घेण्यासाठी इतिहास महत्त्वाचा ठरतो; तसेच, भविष्याचे दिग्दर्शनही इतिहास करू शकतो. म्हणून, इतिहास विसरणा-यांना इतिहास लिहिता येत नाही, असे म्हटले गेले आहे. इतिहासातील जुने व नवे प्रवाह समजून घेणे हा केवळ मनोरंजनाचा नव्हे तर बौद्धिक साक्षेपाचा भाग आहे. गेल्या काही वर्षांमध्ये इतिहासविषयक मोठी तात्विक चर्चा घडून आली आहे. इतिहास म्हणजे काय, त्याचे अभ्यासविषय, इतिहास लेखनातील संशोधनपद्धती, वस्तुनिष्ठता अशा अनेकानेक विषयांवर गहन चर्चा घडून आल्या. 'सबाल्टर्न' म्हणजे वंचितांचा इतिहास हाही एक नवीन प्रवाह आता स्थिरावला आहे. नवमार्क्सवाद, स्त्रीवाद, उत्तराधुनिकतावाद इत्यादी विचारप्रणालींचा प्रभाव इतिहासावर पडलेला आहे. अशा अनेक विषयांचा ऊहापोह या ग्रंथाने पुढे आणला आहे. इतिहास या विषयाचा विशेष अभ्यास करणारे विद्यार्थी, संशोधक व प्राध्यापक या सर्वांना या ग्रंथाचा उपयोग व्हावा. तसेच, केवळ कुतूहल म्हणून इतिहास या विषयाबाबत रूची असणा-यांसाठीही हा ग्रंथ उद्‌बोधक ठरावा. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Postal Regn.No.: PCW/115/2013-2015**
**Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**